मंगळवार, 12 जुलै 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 306
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 12 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-306 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

# यासंदर्भात आम्ही काय ते बघून घेऊ

## शिंदे गटाच्या १६ आमदारांच्या अपात्रेबाबत सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : एकनाथ शिंदे गटाच्या १६ आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला. मात्र, याचवेळी सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र विधानसभेतील कोणत्याही आमदारावर या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत कारवाई करू नये, असे निर्देश विधानसभा अध्यक्षांना दिले आहेत. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणातील अनिश्चितता कायम राहणार आहे. १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत विधानसभेत कोणताही निर्णय घेतला जाऊ नये. यासंदर्भात आम्ही काय ते बघून घेऊ, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले.**

शिवसेनेचे वकील कपिल सिब्बल यांनी या प्रकरणाची तातडीने सुनावणी घ्यावी, अशी मागणी केली. मात्र, या प्रकरणाची तातडीने सुनावणी घेणे शक्य नाही. आम्ही तुम्हाला काय ते कळवू, असे सर्वोच्च न्यायालयाने त्यांना सांगितले. त्यामुळे १६ बंडखोर आमदारांवर अपात्रतेची कारवाई होईल, अशी आशा बाळगून असलेल्या शिवसेनेला आणखी काही काळ वाट पाहावी लागणार आहे. त्याचवेळी दुसऱ्या बाजूला एकनाथ शिंदे गटाच्या आमदारांना कायदेशीर लढाईसाठी आणखी वेळ उपलब्ध झाला आहे. तसेच बंडखोर आमदारांवरील कारवाईही तुर्तास टळली आहे. या काळात शिवसेनेतील आणखी काही आमदार किंवा पदाधिकारी एकनाथ शिंदे यांच्यासोबत आल्यास त्यांची कायदेशीर बाजू भक्कम होऊ शकते.

तर दुसरीकडे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनाही उद्धव ठाकरे यांच्या गटाच्या आमदारांवर कोणतीही कारवाई करता येणार नाही. विधिमंडळ सचिवालयाने रविवारी शिवसेनेतील दोन्ही गटांना व्हीप उल्लंघन प्रकरणात नोटीस बजावली होती. या नोटीसला उत्तर देण्यासाठी दोन्ही गटाच्या आमदारांना ७ दिवसांचा अवधी देण्यात आला आहे. मात्र, आता ७ दिवस झाल्यानंतरही विधानसभा अध्यक्षांना यासंदर्भात कोणताही निर्णय परस्पर घेता येणार नाही. आता या प्रकरणाची सूत्रे पूर्णपणे सर्वोच्च न्यायालयाच्या हातात गेली आहेत.

या प्रकरणावर उद्याही सुनावणी होऊ शकणार नाही. हे प्रकरण आता सुनावणीसाठी घटनापीठाकडे वर्ग होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता शिंदे-फडणवीस सरकारचा मंत्रिमंडळाच्या स्थापनेला मुहूर्त कधी मिळणार, हा प्रश्नही निर्माण झाला आहे. ही सुनावणी दीर्घकाळ सुरु राहू शकते. या काळात राज्याचा कारभार चालवण्यासाठी मंत्रिमंडळ नेमणे आवश्यक आहे. त्यामुळे आता यासंदर्भात भाजप आणि एकनाथ शिंदे गटाकडून काय पावले उचलली जाणार, हे पाहावे लागेल. दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्या गटाकडून सर्वोच्च न्यायालयात नव्या विधानसभा अध्यक्षांच्या निवडीलाच आव्हान देण्यात आले आहे. यासंदर्भात शिवसेनेचे वकील कपिल सिब्बल यांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यामुळे आता ही कायदेशीर लढाई कोणत्या दिशेने जाणार, हे पाहावे लागेल.

### शिंदे गटाकडून निर्णयाचे स्वागत

सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांना दिलेले निर्देश योग्य आहेत. ही एकच याचिका नाही, यात अनेक याचिका आहेत. एकनाथ शिंदे यांची हकालपट्टी करून अजय चौधरी यांना गटनेता नेमणे, तसेच सुनील प्रभू यांची प्रतोद म्हणून नियुक्ती करणे या दोन्ही गोष्टी चुकीच्या आहेत. तसेच उपाध्यक्षांकडे या सगळ्या गोष्टी गेल्या होत्या. आता मात्र नवीन अध्यक्षांची निवड करण्यात आली आहे. त्यामुळे हे सगळे प्रकरण आता अध्यक्ष पाहतील, असे दीपक केसरकर यांनी यावेळी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आहे.



# अशोक स्तंभाचे पंतप्रधान मोदींच्या हस्ते अनावरण

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी संसदेच्या नवीन इमारतीवर बांधण्यात आलेल्या अशोक स्तंभाचे अनावरण केले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेच्या नवीन इमारतीच्या बांधकाम करणाऱ्या कामगारांशी संवादही साधला. यावेळी त्यांच्यासोबत लोकसभा अध्यक्ष ओम बिरला देखील उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी सुरू असलेल्या या कामाचा आढावाही घेतला. या नव्या संसद भवनासंदर्भात संपूर्ण देशात चर्चा सुरू आहे.

संसदेच्या नवीन इमारतीवर बांधण्यात आलेल्या अशोक स्तंभाची उंची ६.५ मीटर असून हे कांस्यपासून बनवलेले आहे. तसेच या स्तंभाचे वजन ९ हजार ५०० किलो आहे. नवीन संसदेच्या छतावर हे अशोक स्तंभ बांधण्यात आले आहे. नवीन संसदेच्या इमारतीचे बांधकाम हिवाळी अधिवेशनापर्यंत पूर्ण होणार आहे.

**सेंट्रल विस्टा अंदर्गत संसदेचे बांधकाम**

सेंट्रल विस्टा प्रोजेक्ट अंतर्गत संसदेच्या नवीन इमारती सोबतच इंडिया गेटजवळ 10 अजून इमारती बांधल्या जाणार आहेत. ज्यामध्ये 51 मंत्रालयाची ऑफिस असणार आहेत. नवीन संसद बनवण्याचे काम टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेडला देण्यात आले आहे.

**सेट्रल विस्टाची गरज काय?**

स्वतंत्र भारतात 1951 मध्ये निवडणूक झाली, त्यावेळी लोकसभेची सदस्य संख्या 489 होती. आजच्या स्थितीत लोकसभेची सदस्य संख्या 543 आणि राज्यसभा सदस्य संख्या 245 आहे. 2021 च्या प्रस्तावित जनगणनेनंतर ही संख्या वाढणार आहे. 2026 च्या परिसीमन नंतर वाढणाऱ्या संसद सदस्यांना बसण्यास सद्याच्या संसद भवनात जागा कमी पडेल. तसेच संसदेच्या जुन्या इमारतीला 100 वर्ष पूर्ण होणार आहे. त्यामुळे नवीन ससंदेचे बांधकाम करण्यात आले आहे.

# 'मातोश्री'वरील बैठकीला सात खासदारांची दांडी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मातोश्री निवासस्थानी पक्षाच्या सर्व खासदारांची बैठक बोलावली होती. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीस एनडीएच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देण्यापासून एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतरचे पडसाद जाणून घेण्यासाठी या बैठकीचे नियोजन करण्यात आले होते.

या बैठकीला शिवसेनेच्या १९ लोकसभा खासदारांपैकी १२ जण उपस्थित होते, तर ७ खासदार अनुपस्थित राहिले. तर राज्यसभेवरील तिघा खासदारांपैकी दोघे जण हजर होते. जवळपास तीन तास ही बैठक सुरु होती. मात्र खासदार संजय राऊत बैठकीतून अचानक बाहेर पडल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत मुर्मूंना पाठिंबा देण्यास राऊतांसह काही खासदारांचा विरोध असल्याचे बोलले जाते.

शिवसेनेचे १२ खासदार आपल्या संपर्कात असल्याचा दावा शिंदे गट आणि भाजप नेत्यांकडून वारंवार केला जातो. भावना गवळी, श्रीकांत शिंदे यांची अनुपस्थिती अपेक्षितच होती. मात्र मंडलिक, पाटील यांच्याही गैरहजेरीने मातोश्रीचे टेन्शन वाढले. मुर्मूंना पाठिंबा देण्यासाठी पत्र लिहिणारे राहुल शेवाळे या बैठकीला हजर तर आहेत, मात्र उपस्थित राहूनही कुठला खासदार वेगळा विचार करणार का, याची चिंता शिवसेनेच्या नेतृत्वाला सतावत असल्याची माहिती आहे. दरम्यान, एनडीएच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याची मागणी बहुतांश खासदारांनी केल्यामुळे संजय राऊत नाराज असल्याचे बोलले जात आहे.

# सोनिया गांधींना नव्याने समन्स

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांना नॅशनल हेराल्ड प्रकरणात पुन्हा समन्स बजावले आहे. सोनिया गांधी यांना नॅशनल हेराल्ड प्रकरणी चौकशीसाठी 21 जुलै रोजी ईडी कार्यालयात हजर राहण्यास सांगितले आहे. याआधीही सोनिया गांधींना ईडीने समन्स बजावले होते. मात्र, तब्येतीच्या कारणामुळे त्यांनी मुदत मागितली होती. दरम्यान, नॅशनल हेराल्ड प्रकरणी सोनिया गांधींचे पुत्र आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांची जवळपास 50 तास चौकशी करण्यात आली होती. असोसिएट जर्नल लिमिटेडचा ताबा घेण्यासाठी सोनिया गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी यंग इंडियन नावाची कंपनी स्थापन केली आणि शेल कंपन्यांच्या माध्यमातून या कंपनीसाठी कर्ज घेण्यात आले, असा आरोप आहे. याचबरोबर, काँग्रेसने असोसिएट जनरल लिमिटेडला 90 कोटी रुपयांचे कथित कर्ज दिल्याचा आरोप आहे. हे कर्ज काँग्रेसने यंग इंडियनला दिले आणि याच आधारावर असोसिएट जर्नल लिमिटेडचे बहुतांश शेअर्स सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याकडे गेले होते.

# भारतीयांसमोर लवकरच चिनी कम !

## यूएनच्या अहवालानुसार भारत सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश होणार



आधुनिक केसरी न्यूज

नवी दिल्ली : चीन आणि भारत हे जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले देश आहेत. सध्या चीन सर्वाधिक लोकसंख्येसह पहिल्या क्रमांकावर आहे, तर भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. पण, लवकरच भारत याबाबतीत चीनला मागे टाकणार आहे. संयुक्त राष्ट्रने जाहीर केलेल्या एका अहवालात हा दावा करण्यात आला आहे. या अहवालानुसार पुढील वर्षापर्यंत भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश होणार आहे.

नोव्हेंबरपर्यंत जगाची लोकसंख्या ही ८ अब्ज होणार


संयुक्त राष्ट्राने जागतिक लोकसंख्या दिनाच्या निमित्ताने हा अहवाल जारी केला. या अहवालानुसार, नोव्हेंबर २०२२ पर्यंत जगाची लोकसंख्या ही ८ अब्ज होण्याची शक्यता आहे. अहवाल पाहता सध्या आशिया खंडात जगातील ६१ टक्के लोकसंख्या आहे. सध्या आशिया खंडात ४.७ अब्ज लोक राहतात. तर यानंतर आफ्रीकेत १.३ अब्ज म्हणजेच १७ टक्के लोकसंख्या आहे. त्यानंतर ७५ कोटी लोक म्हणजेच १० टक्के लोकसंख्या युरोपमध्ये आहे. तर, लॅटिन, अमेरिका आणि कॅरेबिअन देशात ६५ कोटी लोक म्हणजेच ८ टक्के लोकसंख्या, उत्तर अमेरिकेत ३७ कोटी लोक आणि ओशिनीयामध्ये ४.३ कोटी लोक राहातात.

२०२३ पर्यंत भारताची लोकसंख्या चीनपेक्षाही अधिक होणार

जागतिक लोकसंख्या संभावना २०१९ नुसार सध्या चीनमध्ये १.४४ अब्ज लोकसंख्या असून पहिल्या स्थानावर आहे. तर दुसऱ्या स्थानावर १.३९ अब्ज लोकसंख्येसह भारत आहे. जगातील एकूण लोकसंख्येत चीनची १९ टक्के तर भारताची १८ टक्के भागीदारी आहे. अहवालानुसार, २०२३ पर्यंत भारताची लोकसंख्या चीनपेक्षाही अधिक असेल. तर, चीनची लोकसंख्या २०१९ ते २०५० पर्यंत ३.१४ कोटी म्हणजेच जवळपास २.२ टक्क्यांनी कमी होईल.

युनायटेड नेशन्स डिपार्टमेंट ऑफ इकॉनॉमिक अँड सोशल अफेअर्सच्या अंदाजानुसार, १९५० नंतर जगातील लोकसंख्या सध्या सर्वात कमी वेगाने वाढत आहे. या अहवालाच्या अंदाजानुसार, २०३० पर्यंत जगाची लोकसंख्या ८.५ अब्ज होईल. त्याचप्रमाणे २०५० पर्यंत जगाची एकूण लोकसंख्या ९.७ अब्ज आणि २०८० मध्ये ती सुमारे १०.४ अब्जावर पोहोचेल. अहवालानुसार, यानंतर २१०० पर्यंत जगाची लोकसंख्या याच पातळीवर स्थिर राहील.

अनेक विकसनशील देशांमध्ये जन्मदरात घट झाल्याचं अहवालात सांगण्यात आलं आहे. मात्र, काही देशांमध्ये हा दर वाढत आहे. अहवालानुसार, लोकसंख्या वाढीसाठी केवळ ८ देशांची ५० टक्क्यांहून अधिक हात असेल. हे आठही देश आशिया आणि आफ्रिकेतील आहेत. संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार, येत्या काही वर्षांत ज्या आठ देशांची लोकसंख्या झपाट्याने वाढणार आहे डेमोक्रेटिक रिपब्लिक ऑफ कांगो, इजिप्त, इथिओपिया, भारत, नायजेरिया, पाकिस्तान, फिलीपिन्स आणि टांझानिया हे ते ८ देश असतील.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# अवलियांचा गाव : राहाता

आधुनिक केसरी

अहमदनगर जिल्ह्यातील राहाता नावाचं गाव. साईबाबांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या शिर्डीपासून जेमतेम चार किमी असलेलं. अशा या गावी जाण्याचा अचानक योग आला. झालं असं की या गावात रवींद्र धस नावाचे माझे एक वाचक मित्र राहतात. माझी काही पुस्तके त्यांना हवी होती. मी त्यांना विचारलं की तुम्हाला कुरिअरने किंवा पोस्टाने पाठवून देऊ का ? तेव्हा ते म्हणाले, ' सर, मी पुस्तक घेईन पण ते तुमच्या हातून. तुमची सही असलेलं आणि तेही तुम्ही मला माझ्या घरी येऊन देणार आहात. ' रवींद्रची ही प्रेमळ धमकी म्हणा की आग्रह म्हणा, मनाला कुठेतरी स्पर्शून गेली. त्यातली अकृत्रिमता, जिव्हाळा जाणवला आणि मी ठरवलं की चाळीसगावहून पुण्याला जाताना या रवीला भेटायचं. साईबाबांचं दर्शन पण घेता येईल. मला सात जुलैला पुण्याला जायचंच होतं. मग मी शिर्डी मार्गे पुण्याला जाण्याचा निर्णय घेतला. सहा जुलैलाच मी आणि माझी पत्नी सौ श्रद्धा चाळीसगावहून निघालो. दोन तीन दिवस आधी रवींद्रना आम्ही येणार म्हणून फोन केला होता. आम्ही दोघेही सायंकाळी पाचच्या सुमारास राहात्याला पोहोचलो. रवींद्र आम्हाला रस्त्यात घ्यायला हजरच होते. रवींद्र आणि त्यांच्या सौभाग्यवती या दोघांनीही आमचे उत्तम स्वागत आणि आदरातिथ्य केले.

घराच्या खालच्या मजल्यावर रवींद्र यांचे टू व्हीलर दुरुस्तीचे गॅरेज आहे. उच्चशिक्षित असलेला हा माणूसही एक अवलिया आहे. त्यांना जुन्या वस्तू ( अँटिक पीस ) जमवण्याचा छंद आहे. अक्षरशः भंगारातून त्यांनी १९४७ सालची शिलाई मशीन घेतले. मोठ्या खटपटीने ते सुरु केले. एका दुकानदाराने ते मला द्या आणि त्याच्या बदल्यात पाहिजे ते नवीन मशीन घेऊन जा म्हणून त्यांना ऑफर दिली पण मोठ्या कष्टाने आणि मेहनतीने आणलेलं ते मशीन त्यांनी द्यायला नकार दिला. असाच एका दुकानात त्यांना ग्रामोफोन मिळाला. तो त्यांनी सुरु केला. अशा अनेक वस्तू त्यांच्याकडे आहेत. वाचनाची आवड असून उत्तमोत्तम पुस्तकांचा संग्रह आहे.

चहापाणी झाल्यावर रवींद्र म्हणाले , ' सर, माझ्याबरोबर गावात चला. तुम्हाला काही व्यक्तींची ओळख करून देतो.' मला भेटण्यासाठी म्हणून रवींद्र यांच्या घरी प्रा. गाडेकर आले होते. रवींद्र आणि प्रा गाडेकर यांनी मला सांगितले की, ' सर, आमचा साई योग फाउंडेशन नावाचा ग्रुप आहे. त्या ग्रुपच्या वतीने आम्ही वृक्षारोपण, वृक्षाचा वाढदिवस साजरा करणे, योगप्रसार करणे इ. कामे करतो. गेली सहा वर्षे झाले आमचे हे कार्य सुरु असून सात जुलैला आम्ही वृक्षांचा वाढदिवस साजरा करतो. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# भावनिक बुद्धिमत्ता सुधारणे आवश्यक

आधुनिक केसरी

शिक्षणामध्ये राजकीय सहभाग, सामाजिक समानता आणि पर्यावरणीय टिकाव यासारख्या गोष्टींना प्रोत्साहन देऊन सकारात्मक सामाजिक बदल घडवून आणण्याची क्षमता असते. शिक्षण म्हणजे सामाजिकीकरणाच्या विविध औपचारिक आणि अनौपचारिक माध्यमांच्या वातावरणात शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या पद्धतींशी संबंधित असलेल्या शिस्तीचा एक महत्वाचा भाग आहे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

शिक्षणामुळे आपली भावनिक बुद्धिमत्ता सुधारते, आपण एक चांगले नागरिक, चांगली व्यक्ती बनू शकतो. अधिक समजूतदार, दयाळू, आत्मनिर्भर, इतर कोणाच्याही आधी स्वतःवर प्रेम करणारे बनत असतो, म्हणजेच शिक्षणाने जीवन चांगले बनते.

एखाद्या व्यक्तीने आपले ज्ञान आणि कौशल्ये अशा प्रकारे विकसित केले तर ती व्यक्ती शिक्षित मानली जाऊ शकते ज्याचा परिणाम समाज जीवनात त्या व्यक्तीच्या सकारात्मक योगदानात होतो. ज्ञान मिळवून त्याचा उपयोग समाजाच्या सुखासाठी आणि चांगुलपणासाठी केल्याने माणूस खऱ्या अर्थाने शिक्षित बनतो. शाळा त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये काही प्राधान्य मूल्ये आणि दृष्टीकोनांचे पालनपोषण करून मूल्यशिक्षणाचा प्रचार करत असतात, उदा. "चिकाटी", "इतरांचा आदर", "जबाबदारी", "राष्ट्रीय ओळख", "बांधिलकी", "अखंडता", "इतरांची काळजी", "कायद्याचे पालन", "सहानुभूती" आणि "परिश्रम". शिक्षण ही जगातील सर्वात सक्षम शक्ती आहे; त्यातून ज्ञान निर्माण होते, आत्मविश्वास निर्माण होतो आणि संधीतील अडथळे दूर होतात. मुलांसाठी, चांगल्या जीवनाचे दरवाजे उघडणे ही त्यांची गुरुकिल्ली असते. शिक्षण हे बदलाचे एक शक्तिशाली घटक आहे आणि आरोग्य, उपजीविका सुधारण्यासाठी, सामाजिक स्थिरतेला हातभार लावण्यासाठी आणि दीर्घकालीन आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी ते अधिक महत्वपूर्ण भूमिका बजावत असते.



आधुनिक केसरी

**समतोल राखी | सर्वकाळ ||**

**मीठाशी इमान | राखावे संसारी ||**
**रामकृष्ण हरि | परमार्थ ||१||**

**हाती सदा काम | मूखी हरिनाम ||**
**तोचि जाण राम | पुण्यवंत ||२||**

**आशेचे बंधनी | गुंतू नको फार ||**
**निष्काम ते सार | जीवनाचे ||३||**

**काया वाचा मने | भजे पांडुरंग ||**
**नांदतो श्रीरंग | अंतरात ||४||**

**संसार परमार्थ | पुण्याची पालखी ||**
**समतोल राखी | सर्वकाळ ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**मज्जत्वम्भसि पातु मेरुशिखरं शत्रून् जयत्वाहवे**
**वाणिज्यं कृषिसेवने च सकला विद्याः कलाः शिक्षताम्।**
**आकाशं विपुलं प्रयातु खगवत् कृत्वा प्रयत्नं परं**
**नाभाव्यं भवतीह कर्मवशतो भाव्यस्य नाशः कुतः ।।**

**अर्थ :** मनुष्य जलात बुडून जावो, मेरुपर्वताच्या शिखरावर पोहचो, युद्धात शत्रूंवर विजय प्राप्त करो, व्यापार किंवा शेतीच्या उपजीविकेचा स्वीकार करो, सर्व विद्या वा कलांचे शिक्षण घेवो, प्रयत्नाची पराकाष्ठा करून पक्ष्याप्रमाणे आकाशात उड्डाण करो, परंतु या लोकातील असंभवास संभव करू शकत नाही. तसेच जे कर्मवश संभाव्य आहे, त्याच नाश कसे करता येईल? कर्मप्राप्त गोष्ट ही क्रमप्राप्त असते, ती टाळता येत नाही, तिचा स्वीकार केला पाहिजे, असे या श्लोकात भर्तृहरींनी सांगीतले आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



# मायाब्रह्मनिरूपण

आधुनिक केसरी

समर्थांचा हा दासबोधाचा पाचवा समास अभ्यासत असताना मला शाळेची आठवण आली कारण शाळेच्या अभ्यासक्रम ात परिक्षेत हमखास येणारा प्रश्न म्हणजे दोन गोष्टींची तुलना करा? असाच हा "मायाब्रम्हनिरूपण"समास आहे. संपूर्ण समासात माया व ब्रम्ह यांची तुलना अभ्यासायला मिळते. कशी ते आता पाहूया!

"माया व ब्रम्ह हीं कशी असतात?"

1)ब्रम्ह निर्गुण निराकार तर माया सगुण साकार आहे. ब्रम्ह हे अनादीअनंत आहे तर माया परिमित आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

2)ब्रम्ह निर्मळ, निश्चल तर माया चंचल ,चपळ आहे. ब्रम्ह अमर्यादित आहे तर माया मर्यादित आहे.

3)ब्रम्ह दिसत नाही, तर माया दिसते. ब्रम्ह भासत नाही तर माया भासते. ब्रम्ह कल्पांताच्या काळी सुद्धा नाश पावत नाही तर माया नाश पावते.

4)ब्रम्ह निर्माण होत नाही, तर माया निर्माण होते. ब्रम्ह क्षय पावत नाही पण माया मात्र कधीना कधी क्षय पावते. ब्रम्ह अज्ञानी जीवाला आवडत नाही, तर माया अज्ञानी जीवाला आवडते.

5)ब्रम्हाला जन्म मरण नाही ,पण मायेला जन्म मरण आहे. ब्रम्ह धारणेत धरता येत नाही, तर माया धारणेत धरता येते.

6)ब्रम्ह तुटतफुटत नाही ते अविनाशी व अवीट आहे. तर माया तुटतेफुटते व अविनाशी असल्याने विटते कुचकामी होते. मायेचा भास हा वरवरचा पण असु शकतो.

7)ब्रम्ह विकारापासून मुक्त आहे तर माया विकारयुक्त आहे. ब्रम्ह काहीच करत नाही तर माया सर्व काही करते. ब्रम्ह रूपरहीत आहे तर मायेला रूप आहे ती वेगवेगळ्या रूपात दिसून येते. माया नाना रूप धारण करू शकते.

8)ब्रम्ह शाश्वत व एकच आहे तर माया पंचभूतात्मक,अशाश्वत,अनेकपणाने भरलेली आहे. जे जीव आत्मानात्मविवेकी असतात तेच मायेचे व ब्रम्हाचे खरें रूप जाणतात.

9)ब्रम्ह विशाल,सारसर्वस्व, स्थलातीत आहे. तर माया लहान,सारहीन व स्थलयुक्त आहे.मायेमध्ये अलीकडे, पलीकडे असा स्थलयुक्त भेदभाव आहे.

10) या संपूर्ण विश्वात माया पसरलेली आहे.. त्यामुळे ब्रम्ह झाकले गेले आहे. परंतु साधुसंत मायेच्या पसाऱ्यातून तें शुद्ध ब्रम्ह स्वरूप निवडून घेतात. **(क्रमशः)**

# "दत्तप्रभूंची झोळी"

आधुनिक केसरी

दत्तप्रभू यांच्या फोटो कडे पाहिलं की त्यांच्या काखेला सुंदर अशी एक झोळी आहे आणि त्या झोळीमध्ये प्रत्यक्ष अन्नपूर्णा देवीचा वास आहे, ज्या झोळीतून दत्तप्रभू सर्व दत्त भक्तांना हवे ते देत असतात अगदी उदारतेने...

त्या परमात्म्याच्या झोळी मध्ये जी अन्नपूर्णादेवी वास करून आहे तिचे दत्त संप्रदायामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे, दत्त संप्रदायामध्ये अन्नदान या दानाला जेवढं महत्त्व आहे तेवढच पुण्य महाराजांनी त्या दानासाठी भक्तांना बांधून ठेवलेला आहे. जो कोणी अन्नदान करेल किंवा एखाद्या भुकेल्याला अन्न देईल तो दत्त प्रिय असेल आणि असलाच पाहिजे कारण अशीच बुद्धी येत नाही की एखाद्याला अन्नदान करावा किंवा एखाद्या मदत करावी दत्तांच्या मनात जे असेल तेच भक्ताच्या हातून घडून येतं शेवटी कितीही केलं तरी दत्तगुरूंच्या हातातील आपण कठपुतली की हो, तोच आपला पालनकर्ता. मध्यान काळी जर कोणी भिक्षुक, योगी, भिकारी,



मुके जनावर किंवा अजुन कोणी जो उपाशी आहे तुमच्याजवळ किंवा तुमच्या दाराजवळ आला तर त्याला मदत करा, पोटभर जेवण्यास द्या, कारण आपले दत्त महाराज हे देणारे आहेत दत्त म्हणजे देणारा त्यांच्या रस्त्यावरती चालायचं म्हंटल्यावर आपणही फुल ना फुलाची पाकळी मदत केली पाहिजे.

भगवंत हा घर, पैसा, पद, प्रतिष्ठा पाहून नाही तर त्या घरातील लोकांचे मन भक्ती, परमार्थ, प्रेम हे सर्व पाहून तो घरामध्ये येत असतो. मग ती आपली झोपडी असली तरी तो घरामध्ये येतोच.

जो भुकेजल्यांच पोट भरत असेल वेळी प्रसंगी धावून जात असेल. तो नक्कीच दत्त प्रिय असेल.

“जो देवांचाही देव, जो देवांचाही राजा,
जो देवांचाही मालक ब्रह्मांडनायक माझा राजा,
माझा माता-पिता, जो सर्वांचा अधिपती,
काय वर्णू मी त्याची महती असा माझा दिगंबर यती,
दिगंबर यती दिगंबर यती....”

श्रीदत्त नारायण..!!!

**-प्रफुल्ल दुर्गे**



# सप्तश्रृंगी गडावर ढगफुटीसदृश पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडे वाकद :** साडेतीन शक्तीपीठांपैकी अर्धे पीठ असलेल्या व नाशिक जिल्ह्यातील सप्तश्रृंगी गड येथे आज ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. सप्तशृंग गडावर गेल्या चार दिवसापासून संततधार पाऊस पडत आहे.

आज दि.११ दुपारी ३ वाजेच्या सुमारास मुसळधार पावसामुळे सप्तशृंगी मंदिरातील परतीच्या मार्गावरील संरक्षक भिंतीवरील दगड, माती वाहून आल्याने ४ भाविक व २ लहान मुले खाली कोसळून गंभीर जखमी झाले. सप्तश्रृंगी देवस्थान संस्थानच्या दवाखान्यात नेऊन त्यांच्यावर उपचार करण्यात आले आहेत. यामध्ये दोन महिला, दोन पुरूष व दोन लहान मुलांचा समावेश आहे. परतीच्या मार्गावरील डोंगरावरून मोठ्या प्रमाणावर पाऊस येत असल्याने या पाण्याचा जोर वाढल्यामुळे हे पाणी संरक्षण भितीवरून मोठ्या प्रमाणात वाहु लागल्याने ही भिंत कोसळून पायरीवर मोठ्या प्रमाणावर पाणी येऊ लागले. यावेळी भाविक हे पायरी उतरत असतांना पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने पायरीवरुन वाहत गेले.

या घटनेत भाविकांच्या डोक्यावर व हात पायाला गंभीर इजा झाली. याबाबत देवी संस्थानचे कर्मचारी व स्थानिक व्यापारी यांना समजल्याबरोबर तातडीने भाविकांवर देवी संस्थानच्या दवाखान्यात नेऊन उपचार करण्यात आले. या घटनेत निंबाबाई नानु नाईक वय ४५ रा. एंरडोल, अशिष तांरगे वय २३ रा.नागपुर, मनिष राऊत वय ३२ रा.नागपूर, पल्लवी नाईक वय ३ रा. एरंडोल, शैला आव्हाड वय ७ यांना पुढील उपचारासाठी वणी येथे पाठविण्यात आले आहे. डॉ. धनश्री घोडके, निशा गायकवाड, कंपाउंडर शातराम बेनके यांनी जखमींवर उपचार केले.



# परळीतील छोट्या व्यावसायिकाचे सामाजिक भान; गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**परळी वैजनाथ :** श्रीमंत व पैसेवाले भरपूर लोक असतात मात्र प्रत्येकात दानत व सामाजिक भान असेलच असे नाही परंतु परळी शहरातील एक अतिशय सर्वसामान्य व छोटा व्यावसायिक असलेल्या युवकांने सामाजिक भान जपत गेल्या सात वर्षापासून अखंडितपणे शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम हाती घेतलेला आहे. आज (दि.11) मान्यवरांच्या उपस्थितीत गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. परळी शहरातील गोविंदा गोविंदा एंटरप्राइजेस या नावाने नवीन पुस्तके, जुने व नवीन पुस्तके व शैक्षणिक साहित्य विक्री करणारे विश्वंभर देशमुख यांनी अतिशय खडतर परिश्रमातून स्वतःचे दुकान सुरू केलेले आहे. मात्र फार मोठा व्यावसायिक नसतानाही नेहमी सामाजिक कार्य करण्याची धडपड या युवकाची असते. कोरोना काळातील दोन वर्ष वगळता अविरतपणे हा सामाजिक उपक्रम त्यांनी अखंडित सुरू ठेवला आहे. आज मान्यवरांच्या हस्ते या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना 37 विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रा.यु.काँ.चे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे, पोलीस निरीक्षक उमाकांत कस्तुरे, युवा सेनेचे जिल्हा संघटक प्रा.अतुल दुबे, विजय सामत, अभिनव विद्यालयाचे सचिव साहेबराव फड, ज्ञानबोधिनी शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण मुंडे, श्रीराम फड, चारुदत्त करमाळकर, संपादक बालासाहेब फड, अनंत कुलकर्णी, महादेव गित्ते, विष्णू मुंडे, कांबळेसर, आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांचा सत्कार पदमाकर देशमुख, प्रशांत देशमुख, प्रो. प्रा. विश्वांभर देशमुख, आनंदराव कुलकर्णी, आशोक कुलकर्णी, गिरीश प्रयाग, रत्नाकर कुलकर्णी, चेतन शर्मा, उमेशराव नागापुरकर, रामेश पुरभैय्ये, सचीन गोंदगे यांनी केला.



# नगरपालिकांच्या निवडणुका पुढे ढकला

## भाजप नेत्यांचे निवडणूक आयोगाला लेखी निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील 92 नगरपालिका आणि 4 नगरपंचायत निवडणुकांची घोषणा केली आहे. त्यानुसार, 18 ऑगस्ट रोजी मतदान घेण्यात येणार असून 19 ऑगस्ट रोजी निकाल लागण्याची शक्यता आहे. मात्र, आयोगाच्या घोषणेनंतर सर्वच राजकीय पक्षांनी निवडणुका पुढ ढकलण्यासंदर्भात मागणी केली आहे. ओबीसी आरक्षण आणि पाऊसाचे कारण देत ह्या निवडणुका पुढे ढकलण्याची मागणी होत आहे. यासंदर्भात आज भाजप नेत्यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे लेखी निवेदन देऊन मागणी केली आहे.

राज्यात सर्वदूर पडणारा पाऊस, त्यामुळे प्रशासकीय यंत्रणेवर येणारा ताण तसेच ओबीसी राजकीय आरक्षणाचा अनुत्तरित प्रश्न लक्षात घेता नगरपालिका निवडणुका पुढे ढकला, असे निवेदन राज्य निवडणूक आयोगातील अधिकाऱ्यांना भाजपच्यावतीने देण्यात आले. यावेळी, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्यासह राज्यातील प्रमुख नेते उपस्थित होते. दरम्यान, निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर नगरपालिका निवडणुकांची घोषणा केली आहे. त्यासाठी, 20 जुलै रोजी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत निवडणुकीचा कार्यक्रमा जाहीर होणार आहे. त्यामुळे, आाता आयोग काय निर्णय घेईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही निवडणुका पुढे ढकल्यासंदर्भातील मागणी करणार असल्याचे म्हटले होते.

**राष्ट्रवादीकडून 27 टक्के आरक्षणाची घोषणा**

ओबीसी समाजाला न्याय मिळणे आमच्यासाठी सर्वाधिक महत्वाचे असल्याने येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या एकूण उमेदवारांपैकी २७ टक्के उमेदवार ओबीसी समाजाचे देण्याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घेतला आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिली आहे.

# शरद पवारांच्या नाराजीबद्दल प्रश्न विचारताच संजय राऊतांनी विषय संपवला!

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत भाजपाच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देण्याची उघड भूमिका शिवसेनेच्या काही खासदारांनी मांडली होती. त्यानंतर आज मातोश्रीवर झालेल्या बैठकीत शिवसेनेच्या अनेक खासदारांनी द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देण्याची मागणी केली असल्याचे सांगण्यात येत आहे. यातच संजय राऊत यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना महत्वाचे विधान केले आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत शिवसेनेच्या खासदारांची बैठक झाली. या बैठकीत नक्कीच राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीबाबत चर्चा झाली. यशवंत सिन्हा आणि द्रौपदी मुर्मू या उमेदवारांबद्दल बैठकीत चर्चा झाली. शिवसेनेने याआधीही पक्षीय अभिनिवेश बाजूला सारुन राष्ट्रपतीपदासाठी योग्य उमेदवाराला पाठिंबा दिला आहे. बैठकीत खासदारांनी आपल्या भावना मांडल्या आहेत. त्यानंतर निर्णय घेण्याचे सर्वाधिकार खासदारांनी पक्ष प्रमुखांना दिले आहेत. उद्धव ठाकरे जो निर्णय घेतील तो सर्वांना मान्य असेल, असे संजय राऊत म्हणाले.

**'तो' विषय संपला!**

औरंगाबादचे नामांतर संभाजीनगर करण्याच्या निर्णयावर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी हा विषय सरकारच्या किमान समान कार्यक्रमात नव्हता तो ऐनवेळी निर्णय घेण्यात आला, अशी प्रतिक्रिया दिली. याबाबत विचारण्यात आले असता संजय राऊत यांनी 'संपला विषय' इतकेच म्हटले आणि अधिक बोलणे टाळले.

दरम्यान, भाजपाकडून द्रौपदी मुर्मू आणि विरोधकांकडून यशवंत सिन्हा यांना राष्ट्रपतीपदाची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे या निवडणुकीत शिवसेनेच्या खासदारांचा पाठिंबा यशवंत सिन्हा यांनाच राहावा, अशी शिवसेनेचे नेते संजय राऊत यांची इच्छा होती. मात्र मातोश्रीवर झालेल्या बैठकीत शिवसेनेच्या अनेक खासदारांनी भाजपाच्या द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा देण्याची भूमिका मांडल्याचे सांगण्यात येत आहे. खासदारांच्या या भूमिकेवर संजय राऊत नाराज झाल्याची माहिती देखील समोर येत आहे.

**शरद पवार नेमके काय म्हणाले?**

औरंगाबादच्या नामांतराचा निर्णय घेणार हे मला माहिती नव्हते. नामांतराच्या निर्णयाबाबत योग्य पद्धतीने माहिती देण्यात आली नाही. औरंगाबाद आणि उस्मानाबाद शहराचे नामांतर करताना सुसंवाद साधला गेला नाही. थेट मंत्रिमंडळात प्रस्ताव मंजूर झाल्यावरच याबाबत समजले. नामांतराच्या मुद्द्यावर हवी तशी चर्चा झाली नाही. नामांतरापेक्षा इतर मूलभूत प्रश्नावर लक्ष देणे गरजेचे होते. नामांतराचा मुद्दा हा किमान समान कार्यक्रमाचा भाग नव्हता, असे शरद पवार म्हणाले होते.



# सेवापथ सोशल फाउंडेशनच्या वतीने वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सेवापथ सोशल फाउंडेशन या सामाजिक संस्थेमार्फ़त आज दि.9 रोज शनिवारी हिरापुरवाड़ी येथे आर.के. फ्लैट्स समोरील आरक्षित खुल्या जागेवर "वृक्षारोपणः एक पौधा, एक संकल्प" अभियांना अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते राजेश आंधळे, संतोष गाडेकर, संजय लाघे, आशु गारमेंट्स च्या माया लोंढे, फैशन डिझाइन कॉलेज च्या प्राध्यापिका अर्चना साळवे यांची प्रमुख उपस्थित होती.

या अभियाना अंतर्गत शहरी व ग्रामीण भागात लोकसहभागातुन वृक्षारोपण व संवर्धन विषयी जनजागृती करून विविध सामाजिक संस्था सोबत संलग्न होऊन जास्तीत जास्त ठिकाणी वृक्षारोपण "एक पौधा, एक संकल्प" हा अभियान रबविणार आहोत, असे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शेख अकबर यांनी कळविले. ओमेश राठौर आणि बालकिसन पगारे यांच्या अधिपत्याखाली कार्यक्रमाचे सुनियोजन करण्यात आले होते. या अभिनव उपक्रमास यशस्वी करण्यासाठी शिवाजी राईंद, बळीराम घोड्जकर, दादाराव पवार, अफसर शेख, पंडित बोरसे, सोहेल खान, समीर पठाण, हरिभाऊ देशमुख, प्रवीण काकड़े, संबोध मगरे, प्रतिभा पांडे, राजश्री डोंगरे, मयूर भावसार, रामकिसन खरडेकर, मनिषा गिऱ्हे, अॅड. सुजीत कोळी, उमा दगडे, निलेश काळे, राहुल राजपूत आदींचे सहकार्य लाभत आहे.



# नव्या विक्रांतचा प्रवास

आधुनिक केसरी

नौदलाच्या सामर्थ्यात मोलाची भर घालणारी आयएनएस विक्रांत ही स्वदेशी बनावटीच्या विमानवाहू युद्धनौका आता नौदलात दाखल होण्यासाठी सज्ज झाली आहे. काल म्हणजे रविवारी आयएनएस विक्रांतची चौथी आणि अखेरची चाचणी यशस्वीरित्या पार पडली. भर समुद्रात विविध उपकरणांच्या चाचण्या झाल्यावर विक्रांत काल कोच्ची बंदरातल्या कोच्ची शिपयार्डच्या तळावर परतली. जुलै महिन्याच्या अखेरीस विक्रांत ही नौदलाकडे सूपुर्त केली जाईल. येत्या १५ ऑगस्टला आयएनएस विक्रांत नौदलाच्या सेवेते दाखल करत आझादी का अमृतमहोत्सव कार्यक्रम साजरा केला जाणार आहे. नौदलात एखादी युद्धनौका-पाणबुडी ही सेवेतून निवृत्त झाली की तेच नाव कालांतराने त्याच प्रकारच्या श्रेणीतील युद्धनौकांना द्यायची प्रथा आहे. म्हणजेच नौदलात युद्धनौकेला दिलेले नाव हे कधीही पुसले जात नाही, नष्ट होत नाही, व्यपगत होत नाही. नव्या युद्धनौकेच्या निमित्ताने विक्रांत हे नाव कायम रहाणार आहे. ब्रिटीशांनी वापरलेल्या विमानवाहू युद्धनौकेची डागडुजी करत भारतीय नौदलाने पहिली विमानवाहू युद्धनौका १९६१ च्या सुमारास सेवेत दाखल करुन घेतली. तिचे नामकरण आयएनएस विक्रांत असे करण्यात आले. ही विक्रांत १९९७ ला सेवेतून निवृत्त झाली. आता हेच नाव स्वदेशी बनावटीच्या पहिल्या विमानवाहू युद्धनौकेला देण्यात आले आहे. नवी आयएनएस विक्रांतची बांधणी ही स्वबळावर, स्वबळावर आरेखन करत, स्वदेशी तंत्रज्ञान वापरत करण्यात आली आहे. देशाचा विस्तृत समुद्रकिनारा, बदलती सामरिक परिस्थिती लक्षात घेता १९९० च्या दशकात नव्या आणि स्वदेशी बनावटीच्या विमानवाहू युद्धनौकेची आवश्यकता भासू लागली. त्यानुसार विक्रांतचा आराखडा निश्चित करत कोच्ची शिपयार्डमध्ये फेब्रुवारी २००९ ला विक्रांतच्या बांधणीला सुरुवात झाली. ऑगस्ट २०13 मध्ये युद्धनौकेचे जलावतरण करण्यात आले. त्यानंतर विविध उपकरणे युद्धनौकेवर बसवण्यात आली. करोना काळामुळे विक्रांतच्या चाचण्यांना जरा उशीर झाला. असे असले तरी ऑगस्ट २०२१ ला पहिली, ऑक्टोबर २०२१ला दुसरी, जानेवारी २०२२ ला तिसरी आणि त्यानंतर जूलैच्या पहिल्या आठवड्यात विक्रांतची चौथी चाचणी यशस्वी झाली. या सर्व चाचण्यांमध्ये युद्धनौकेचे मुख्य इंजिन, रडार, संदेशवहन यंत्रणा, विविध अन्य उपकरणे यांच्या चाचण्या घेण्यात आल्या. तसेच लढाऊ विमाने आणि हेलिकॉप्टर हाताळण्याची युद्धनौकेची क्षमता तपासण्यात आली. आता या सर्व चाचण्या यशस्वी पूर्ण झाल्या असल्याने विक्रांत लवकरच नौदलात दखल होणार आहे. विक्रांत ही विमानवाहू युद्धनौका आहे, म्हणजे एकप्रकारे तरंगता विमानतळ हा विक्रांतवर आहे. एकाच वेळी ३० पेक्षा जास्त विविध प्रकारची लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर हाताळण्याची विक्रांतची क्षमता आहे. विक्रांतचे वजन हे तब्बल ४० हजार टन एवढे असून पुर्ण क्षमतेने कार्यरत असतांना हे वजन ४५ हजार टन एवढे असते. एका दमात १५ हजार किलोमीटर एवढा पल्ला गाठण्याची विक्रांतची क्षमता आहे. तब्बल १४०० पेक्षा जास्त नौसैनिक अधिकारी-कर्मचारी हे विक्रांतवर तैनात असतात. हवेतील १०० किलोमीटर पर्यंतचे विविध उंचीवरील लक्ष्य भेदणारी बराक-८ ही क्षेपणास्त्रे विक्रांतवर तैनात असणार आहे. तब्बल २६२ मीटर लांब आणि १४ मजली उंच अशी या स्वदेशी बनावटीच्या विमानवाहू युद्धनौकेमुळे नौदलाच्या प्रहार क्षमतेत मोलाची भर पडणार आहे. विमानवाहू युद्धनौका बांधण्याचे तंत्रज्ञान हे अत्यंत आव्हानात्मक समजले जाते. विक्रांतची बांधणी हे ६६ टक्क्यांपेक्षा जास्त स्वदेशी आहे. विमनानवाहू युद्धनौक बांधणे हे जगात आत्तापर्यंत फक्त मोजक्या देशांना शक्य झाले आहे. आता यामध्ये भारताचीही भर पडली आहे.



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# वाढती लोकसंख्या जगाला घातक

आधुनिक केसरी

**लोकसंख्या अशीच वाढत राहाली तर "निसर्गाचा ह्रास आणि लोकसंख्या वाढीचा त्रास" जगातील प्रत्येक व्यक्तीला, संपूर्ण जीवजंतूला व वन्य प्राण्यांना भोगावाच लागेल. वाढत्या लोकसंख्येचा धोका पहाता जागतिक स्तरावर लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आणण्याची नितांत गरज आहे.**

लोकसंख्या वाढ ही जगातील प्रत्येक देशाच्या विकासामध्ये व्यत्यय निर्माण करीत असते. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रणाच्या उद्देशाने ११ जुलै १९८७ ला जागतिक लोकसंख्येचा विचार केला तर ५०० कोटी लोकसंख्या असल्याचे लक्षात आले. ही बातमी जगभर पसरली. त्या उद्देशाने लोकसंख्या नियंत्रणासाठी वेगवेगळे कार्यक्रम राबविण्यात येवू लागले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकासविषयक कार्यक्रमाच्या (UNDP) गव्हर्निंग कौन्सिलने ११ जुलै हा दिवस "जागतिक लोकसंख्या दिन" जगभर साजरा केला जावा अशी शिफारस केली. या शिफारशीनुसार ११ जुलै १९८९ पासून ११ जुलै हा दिवस"जागतिक लोकसंख्या दिन"म्हणून साजरा केला जातो. जगाची लोकसंख्या १९८७ ला ५०० कोटी होती. यानंतर २०१९ मध्ये ७७० कोटींवर पोचली. यात सर्वाधिक लोकसंख्या आशिया खंडात ४४६.२७ कोटी असल्याचे दिसून आले. यानंतर आफ्रिका, युरोप, उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया व अंटार्टिका अशा पध्दतीने या खंडात लोकसंख्येचा क्रमवार होता. भारताचा विचार केला तर १९५१ साली फक्त ३६ कोटी लोकसंख्या होती. ती आजच्या घडीला १३५ कोटी झाली आहे. हा भारतासाठी चिंतेचा आणि गंभीर विषय आहे. २०१४ च्या आकडेवारी नुसार सर्वाधिक लोकसंख्या असनारे देश याप्रमाणे प्रथम चीन, भारत, अमेरिका, इंडोनेशिया, पाकिस्तान, ब्राझील, नायजेरिया, बांगलादेश, रशिया व जापान ४३८ कोटी लोक या दहा देशात रहातात. हा आकडा जागतिक लोकसंख्येच्या ५७ टक्के इतका आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे. आज संपूर्ण जगात लोकसंख्या वाढीचा विचार केला तर भारताच्या भूभागाच्या तुलनेत लोकसंख्येच्या बाबतीत भारत प्रथम क्रमांकावर आहे आणि चीनच्या भूभागाच्या तुलनेत चीन लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. आज भारताची लोकसंख्या १३५ कोटींच्या घरात आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे. भारतातील लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रत्येक राज्यांनी पुढाकार घ्यायला पाहिजे व मुख्यत्वेकरून मुख्यमंत्र्यांनी याकडे जातीने लक्ष घालायला हवे. त्याचबरोबर पंतप्रधान, राष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष व पक्ष-विपक्षांनी लोकसंख्या नियंत्रणासाठी पुढाकार घ्यायला हवा. वाढती लोकसंख्या संपूर्ण देशालाच नाही तर संपूर्ण जगाला घातक ठरत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक देशांना कठोर परीस्थितीशी सामना करावा लागत आहे. यामुळे बेरोजगारी, भूकमरी, महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, महागडे शिक्षण, उपासमार, कुपोषण, पाणीटंचाई, इंधन, औषधांची समस्या इत्यादींचा सामना आज सर्वांनाच करावा लागत आहे.वाढती लोकसंख्या प्रत्येक देशाला विकासापासून वंचित करण्याचे कार्य करीत असते याकरिता प्रत्येक देशाचे दायीत्व बनते की लोकसंख्या नियंत्रण काळाची गरज आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशाचा विकास खुंटतो व देश डबघाईस येतो. देशाची वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहरीकरणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्याचप्रमाणे कारखाने व उद्योग धंदे मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे लोकांच्या रहाण्याच्या व्यवस्थेकरिता मोठ्या प्रमाणात जंगल संपत्तीचा विनाश होत आहे. म्हणजेच लोकसंख्या वाढीमुळे जंगलसंपदा संपुष्टात येत आहे. त्यामुळे आज जंगलातील हिंसक प्राणी शहरांकडे



धाव घेतांना दिसतात.भारतातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता यावर नियंत्रण आणण्याची नितांत गरज आहे. वाढत्या लोकसंख्येचे विक्राळ रूप पहाता आता भारत सरकारने "एक परीवार एकच अपत्य" असा कायदा अंमलात आणावा मग तो व्यक्ती कोणत्याही धर्माचा असो.यामुळे लोकसंख्येवर नियंत्रण ठेवता येईल. अन्यथा भारतात अशीच लोकसंख्या वाढत राहाली तर माणूस मानसाला मारल्याशिवाय रहाणार नाही. कारण वाढत्या लोकसंख्येमुळे देशाच्या विकासासाठी अनेक अडथळे निर्माण होताना दिसतात. भारतात लोकसंख्या इतकी झपाट्याने वाढली आहे की अनेक लोक फुटपाथवर झोपताना दिसतात, नदीच्या काठावर घरे, रेल्वे रूळाच्या जवळ घरे, तलावाच्या काठावर घरे अशा दुर्घटना स्थळी मोठ्या प्रमाणात झोपड्या पहायला मिळतात हा संपूर्ण प्रकार लोकसंख्या वाढीचा आहे. आज जगाला लोकसंख्या वाढीपेक्षा वृक्ष वाढवीण्याची नितांत गरज आहे.कारण वृक्ष तोडीमुळे सुर्य आग ओकत आहे.आज पृथ्वी लोकसंख्या वाढीच्या भाराखाली दिवसेंदिवस दबत आहे.त्यामुळे आज लोकसंख्या वाढीपेक्षा निसर्ग वाढीवर भारतासह संपूर्ण जगाने जास्त भर दिला पाहिजे."निसर्गाचा ह्रास आणि लोकसंख्या वाढीचा त्रास"दिवसेंदिवस संपूर्ण जगाला होत आहे.याला कोठेतरी रोखले पाहिजे.मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी लोकसंख्या वाढवीली आहे. त्यामुळे आज हिंसक प्राणी मानवावर आक्रमण करताना दिसतात यामुळे मनुष्य व प्राणी यांच्यात वैरत्व निर्माण झाले आहे.ही परीस्थिती मानवाने स्वतःहुन ओढावली आहे. मानवाच्या अतीरेकामुळे आज पृथ्वीचे संतुलन डगमगतांना दिसत आहे. त्याचबरोबर समुद्राची पातळी दरवर्षी सरासरी ३.५ मिलिमीटरने वाढत आहे. म्हणजेच दिवसेंदिवस पृथ्वीचा भूभाग धोकादायक स्थितीमध्ये मानवाने आणल्याचे दिसून येते. कोविड-१९ महामारी हीसुध्दा मानवाच्या अतीरेकाचे कारण आहे. चीनमध्ये एवढी लोकसंख्या वाढली आहे की तेथील लोक समुद्र किनाऱ्यावर रहातात. त्यामुळे चीन "विस्तारवादाचे" घृनीत कृत्य करताना दिसतो. हा संपूर्ण प्रकार चीनच्या वाढत्या लोकसंख्येमुळे उद्भवलेला आहे.चीनच्या विस्तारवादाच्या भूमिकेमुळे जगातील अनेक देश चीनच्या विरोधात गेले आहे. म्हणजेच लोकसंख्या वाढीचा एवढा घातक परिणाम होत आहे की मानव एक-मेकावर बंदुक तानुन बारूदच्या ढीगाऱ्यावर बसला आहे. यावरून स्पष्ट होते की लोकसंख्या वाढीमुळे जग भुईसपाट व्हायला काहीच वेळ लागणार नाही. त्यामुळे लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणे प्रत्येक देशाचे प्रथम कर्तव्य असायला पाहिजे असे मी समजतो. आज लोकसंख्या वाढीमुळे भारताच्या दरडोई उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. वाढती लोकसंख्या पहाता अनेक व्यापारीवर्ग भेसळयुक्त पदार्थ, कार्बाइडने पिकवीलेली विषारीयुक्त फळे, भेसळयुक्त दूध इत्यादी अनेक विषारी वस्तुचा वापर लोकांना करावा लागतो.यामुळे घातक बीमाऱ्यासुध्दा होवू शकतात आणि होत आहे.यामागचे मुख्य कारण म्हणजे वाढती लोकसंख्या होय. अनेक कारणांवरून असे दिसून येते की वाढत्या लोकसंख्येमुळे भारतासह अनेक देशांमध्ये विक्राळ रूप धारण केले आहे. याला रोखण्यासाठी कठोर पावले उचलन्याची नितांत गरज आहे. जगात व देशात वाढत्या प्रदूषणाला जबाबदार वाढती लोकसंख्याच आहे. लोकांच्या सुखसुविधांकरिता विमान वाहातुक, रोड वाहातुक, रेल्वे वाहतूक व इतर वाहतूक इत्यादी मोठ्या प्रमाणात वाहने धावताना दीसतात, यामुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याचा परीनाम असा होत आहे की अनेक आजारांना खुले आमंत्रण दिल्या जात आहे. त्यामुळे ११ जुलै जागतिक लोकसंख्या दिन लक्षात घेता देशातील सर्व राज्यांनी व केंद्र सरकारनी वाढती लोकसंख्या नियंत्रणासाठी युध्दपातळीवर प्रयत्न केले पाहिजेत. कारण वाढती लोकसंख्या देशाला दीवसेंदीवस घातक ठरत आहे. काही राजकीय पक्ष आपला धर्म धोक्यात आहे, आपल्या धर्माची लोकसंख्या कमी होत आहे असे सांगून धर्माचे काही ठेकेदार लोकसंख्या वाढवीण्याचा सल्ला देतात. अशांवर राज्य व केंद्र सरकारने ताबडतोब कठोर कारवाई केली पाहिजे. मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे. त्यामुळे मानवाने संपूर्ण सीमारेषांचे उल्लंघन केल्याचे दिसून येते. मानवाच्या बुध्दीजीपनामुळे आज निसर्गाच्या सान्निध्यात रहाणाऱ्या पशु-पक्षांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.याचे मुख्य कारण म्हणजे वाढती लोकसंख्या होय. भारताने लोकसंख्येवर वेळीच नियंत्रण ठेवले नाही तर पुढेचालुन अनेक कठीणायीचा सामना करावा लागेल हेही तेवढेच सत्य आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# लोकसंख्या शिक्षण काळाची गरज

आधुनिक केसरी

**देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्रय असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठा अडसर ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही.**

११ जुलै हा दिवस जगभर जागतिक लोकसंख्या दिन म्हणून पाळला जातो. ११ जुलै १९८७ रोजी जगात पाच अब्जावे बालक जन्माला आलं तेंव्हापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून पाळला जातो. १९८७ ते २०११ म्हणजे अवघ्या चोवीस वर्षात जगाची लोकसंख्या दोन अब्जानी वाढून ती सात कोटींपर्यंत पोहचली याचाच अर्थ जगाची लोकसंख्या तुफान वेगाने वाढत आहे. भारतात तर लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे. आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या आसपास आहे. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपली लोकसंख्या तीस कोटी होती याचा अर्थ मागील सत्तर वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११० कोटींनी वाढली. लोकसंख्येत भारत जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे पण लवकरच भारत चीनला मागे टाकून पहिल्या क्रमांकावर पोहचेल असे जाणकारांचे मत आहे. अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्रय असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठा अडसर ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासनस्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही. कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या हट्टापायी तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभागही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम वेग धरत नाही. लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिडीमध्ये लोकसंख्येविषयी योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी नव्या पीडिला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे. अवघ्या २४ वर्षात जगाची लोकसंख्या पाच अब्जानी वाढली तर देशाची लोकसंख्या सत्तर वर्षात ११० कोटींनी वाढली या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर काय होईल हे नव्या पीडिला समजावून सांगावे लागेल. देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर सर्वानाच अडचणींचा सामना करावा लागेल. आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न आहोत. हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालावाच लागेल हे नवीन पीडिला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम, निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे त्यामुळे केवळ तरुणांनाच नव्हे तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे. लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रीपदाची अडीच वर्षे नासविली



कालिदास आपेट
संपर्क क्र. : 9822061795

आधुनिक केसरी

**आयुष्यातील अडीच वर्षाचा मोठा कालावधी उध्दव ठाकरेंनी मुख्यमंत्रीपदावर घालविला. कसलीही दिशा नसलेला माणूस महत्वाच्या पदावर आल्यास काय होते? याचा अनुभव पुरोगामी, डावे, समाजवादी, कम्युनिस्ट, धर्मनिरपेक्षवादी आणि तथाकथित कडव्या हिंदुत्ववाद्यांनी घेतला. कायदा सुव्यवस्था पूर्णपुणे ढेपाळली तरीही उध्दवजी कुशलतेने परिस्थिती हाताळीत आहेत, अशी तळी उचलण्याचा प्रयत्न करीत असतानाच उध्दव ठाकरेंना मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला.याचा अर्थ नव्याने सत्तेवर आलेले फारचं कर्तबगार आहेत असा होत नाही.**

**शेतकऱ्यांची वीज कापली**

मुंबई उच्च न्यायालयातील याचिका क्रमांक 8651/2010 मध्ये शेतकऱ्यांना 15 दिवसाची आगावू नोटीस दिल्याशिवाय वीज कापणे बेकायदेशीर आहे.असा निकाल न्यायमूर्ती डी.वाय.चंद्रच्यूड यांनी दिला. उच्च न्यायालयातील याचिका क्रमांक 44/2012 मध्ये महावितरणचे तत्कालीन मुख्य अधिकारी श्री.मु.स.केळे यांनी वीज बीलासाठी शेतकऱ्यांची वीज कापणार नाही असे शपथपत्र सादर केले. देवेंद्र सरकारचे वीजमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांची पाच वर्षे वीज कापली नाही.18 डिसेंबर 2020 रोजी कोरोना काळात शासन निर्णय करून उध्दव ठाकरे सरकारचे काँग्रेसी ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी शेतकऱ्यांची वीज कापण्याचे आदेश दिले.अजित पवारांनी वीज कापू नका अशा सूचना दिल्या तेव्हा काँग्रेसी नितीन राऊत यांनी माझ्या खात्यात हस्तक्षेप चालणार नाही.असे अजित पवारांना खडसावले.यात मुख्यमंत्री म्हणून उध्दव ठाकरेंनी कसलीही भूमिका मांडली नाही.ऐन भरात आलेली शेतकऱ्यांची पीके वाळविली.उधार,उसनवारी करूनच नव्हे तर खाजगी सावकाराकडून व्याजाने पैसे काढून वीज बिले भरावी लागली.शेतकऱ्यांची वीज कुठलीही नोटीस न देता तोडणाऱ्या उध्दव ठाकरेंना राजीनामा दिल्यानंतर प्रचंड समर्थन असल्याचा प्रचार केला जात आहे.

**दोन इथेनॉल कारखान्यात हवाई अंतराची अट**

शेतकरी संघटनेचे संस्थापक शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करुन शेतकरी संघटनेने ऊसावरिल झोनबंदीचा कायदा रद्द केला. भ्रष्ट आणि अकार्यक्षम साखर सम्राटांनी दोन साखर कारखान्यामध्ये 25 किलोमीटर हवाई अंतराची अट लादून नविन साखर कारखानाचं काढता येणार नाही. अशी सोय केली. याकरिता काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी सन 2014 साली देवेंद्र फडणवीसांना विश्वासमतावेळी थेट मतदान केले. मागिल दहा वर्षांत एकही नवीन साखर कारखाना महाराष्ट्रात उभारला नाही.उत्तरप्रदेश,गुजरात, पंजाबात ऊसाचे भाव वाढले असताना महाराष्ट्रात ऊसाचे भाव कमी झाले आहेत.अतिरिक्त ऊसाचा प्रश्न तयार झाला आहे.

सन 2019 साली साखर सम्राटांनी उध्दव ठाकरेंना मुख्यमंत्री म्हणून पदावर बसविले. याबदल्यात दोन इथेनॉल कारखान्यांमध्ये 25 किलोमीटर हवाई अंतराची अट घालण्याची भूमिका मांडली. वीज कापून शेतकऱ्यांची पीके वाळविणाऱ्या उध्दव ठाकरेंनी मोदी सरकारला दोन साखर कारखान्याप्रमाणे इथेनॉल कारखान्यात सुध्दा 25 किलोमीटर हवाई अंतराची अट घालावी अशी शिफारस केली. बोलघेवड्या नितीन गडकरींनी केंद्र सरकारमधील आपल्या पदाचा वापर करून दोन साखर आणि इथेनॉल कारखान्यासाठी 25 किलोमीटर हवाई अंतराची अट घातली. मुख्यमंत्रीपदासाठी शेतकऱ्यांच्या घरावरून आपण नांगर फिरवला. शेतकऱ्यांच्या व्यवसाय स्वातंत्र्याला आपण ना लावीत आहोत याचे भान उध्दव ठाकरेंनी राखले नाही.

**गोवंश हत्याबंदी कायदा रद्द केला नाही**

साखर कारखाने, सूतगिरण्या, दुधसंघ, बँका, पतपेढया, बाजार समित्या, रेशनची दुकाने, देशी दारुची दुकाने आणि शिक्षणसंस्था यामधील भ्रष्ट,अकार्यक्षम कारभाराला संरक्षण देण्याच्या बदल्यात काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी जसे देवेंद्र फडणवीस यांना मतदान केले होते.तसेच उध्दव ठाकरेंनाही मुख्यमंत्री पदावर बसविले. देवेंद्र फडणवीसांनी गोवंश हत्याबंदी कायद्याची अंमलबजावणी केल्यामुळे पोलिसांना नवीन कुरण तयार झाले. उध्दव ठाकरेंनी नागपूर विधानसभेतील भाषणात 'महाराष्ट्रात गोमाता आणि गोव्यात जावून खाता' असे बेगडी हिंदुत्व चालणार नाही.अशी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर भुमिका मांडली होती. गोवंश हत्याबंदी कायदा रद्द करण्याचे सुतोवाच केले होते.मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती कुलकर्णी यांनी बैलांच्या हत्तेसंबंधी राज्याचे धोरण ठरविण्याचे सांगूनही अडीच वर्षाच्या कालावधीत उध्दव ठाकरेंना वेळ भेटला नाही.तकलादू हिंदुत्वाची व्याख्या करण्यात कधी पायउतार



झाले?हे सुद्धा समजले नाही.गोवंश हत्या बंदी कायद्यामुळे शेतकऱ्यांचे पशुधन फुकट द्यावे लागते.पशुधन 18% कमी झाले आहे.

**आपत्ती निवारणावर लक्ष नाही**

कोरोना महामारीच्या नावाखाली पोलिसांनी आणिबाणी लादली. दुध,भाजीपाला, खरबूज,टरबूज,केळी यांसारख्या नाशवंत वस्तू विकताना शेतकऱ्यांना अपमानित केले. त्यातच वीज बीलाची वसुली केली.पोलिसी अत्याचारामुळे अनेकदा जगणं नकोसं वाटतं होतं.रात्रभर शेतात काम करुन शेतीमाल विकायला गेल्यास पोलिसांनी ठोकून काढलं! तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन केला. त्याचवेळी साखर सम्राटांची 'दारू' मात्र पोलिसी बंदोबस्तात विकली.आमदार,खासदारांच्या दुधसंघाचे भेसळयुक्त दूधाला पोलिसांचे संरक्षण मिळाले ही कोरोना काळातील परिस्थिती होती. तोक्तेवादळ,पूरग्रस्त,अतिवृष्टीमुळे फळबागांचे अपरिमीत नुकसान झाले. बीड, उस्मानाबाद, परभणी, जालना, बुलढाणा, यवतमाळ, अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीकविमा भरुनसुध्दा कसलीही नुकसानभरपाई नाही. कृषी आयुक्त, विमाकंपन्यांच्या कार्यालयात जाऊन शेतकरी थकून गेले. कोरोना काळात मंत्रालयात येण्यास सामान्य माणसाला बंदी घातली. तक्रार कुणाकडे करणार? काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांना बोलावून सांगण्याची हिंमत उध्दव ठाकरेंनी अडीच वर्षांत कधीही दाखविली नाही. आपत्तीनिवारणाच्या नुसत्याचं घोषणा केल्या. कुणालाही मदत मिळाली म्हणून समाधान नाही.बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची भरपाई अजून मिळाली नाही.कोकणात वादळामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई नाही. कोल्हापूर, सांगली, सातारा पूरग्रस्तांना मदत नाही.अडीच वर्षात चालूबाकी असणाऱ्या कर्जदारांना 50 हजारांचे अनुदान मिळाले नाही. आपत्ती निवारण यंत्रणा आहे की, नाही?यावर उध्दव ठाकरेंचे अजिबात लक्ष नव्हते.

**शरद पवारांना अतिमहत्त्व**

एस.टी.कर्मचाऱ्यांनी सहा महिन्यांहून अधिक काळ विलीनीकरणासाठी लढा दिला.उध्दव ठाकरेंनी त्याकडे ढुंकूनही पाहिले नाही.शरद पवारांनी आपल्याकडे लक्ष खेचण्यासाठी एस.टी. कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाचा पूरेपूर वापर केला. उध्दव ठाकरेंवर टीका केली म्हणून कंगणा राणावतचे मुंबईतील घर पाडणे. मातोश्रीवर हनुमान चालिसा म्हणण्याच्या गुन्ह्यात नवनीत राणा आणि रवी राणा या खासदार,आमदारांना 15 दिवस पोलिस कोठडीत डांबून ठेवणे.शरद पवारांबद्दलची फेसबुक पोस्ट शेअर केली म्हणून केतकी चितळेला 41 दिवस तुरुंगात घालणे.करुणा मुंडेंच्या गाडीत पिस्तूल ठेवून त्यांच्यावरचं अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करुन बीडच्या जेलमध्ये घालणे.अशा घटनांचे उध्दव ठाकरेंनी समर्थन केले.सन 2004 पासून शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती आणि वीजबिल

मुक्तीचे दिलेले आश्वासन उध्दव ठाकरे विसरून गेले. काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांनी अक्षरशः धुडगूस घातला. त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष केल्याने स्वतःची प्रतिमा कशी उंचावेल?

**(लेखक शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष आहेत.)**

# मराठवाड्याचे वैभव, डोळस परिवर्तनवादी संत
# वै. ह.भ.प. मारोती महाराज दस्तापूरकर

आधुनिक केसरी

**मानवतावादी प्रेरणेचा विचारप्रवाह आधुनिक काळामध्ये पुढे नेण्याचे कार्य मराठवाड्यातील मातीत जन्मलेल्या वैकुंठवासी ह.भ.प. मारोती महाराज दस्तापुरकर यांनी केले. आज त्यांचा निर्वाण दिन. त्यानिमित्त या थोर मानवतावादी संताला विनम्र अभिवादन !**

महाराष्ट्र ही साधू-संतांची, गुणवंतांची, ज्ञांनवंताची, विचारवंतांची, समाजसुधारकांची भूमी आहे. या भूमीत अनेक नररत्ने जन्माला आली. त्यात मराठवाड्यातील अत्यंत दुर्गम भागात एका महात्म्याचा जन्म झाला. वैकुंठवासी मारोती महाराज असे त्या महात्म्याचे नाव. त्यांचा जन्म परभणी जिल्ह्यातील दस्तापूर या गावी झाला. तोही हनुमान जयंतीच्या दिवसी. म्हणून आई-वडीलांनी त्यांचे नाव मारोती असे ठेवले. ते नाव महाराजांनी सार्थक करून दाखवले. महाराजांच्या घरांमध्ये गावची पाटीलकी असतानासूद्धा. संत मारोती महाराज दस्तापूरकर हे एक अवतारी सिद्धपुरुष, साक्षात्कारी संत होते. त्यांनी आपले संपूर्ण जीवन वारकरी सांप्रदायाला समर्पित केले होते. मारोती महाराज यांनी अध्यात्मातून अठरा पगड जातींच्या लोकांमध्ये चांगल्या विचारांची पेरणी केली. त्यांनी माणसाला माणूस म्हणून जगण्याचे शिकविले आणि चालू असलेल्या अनिष्ट रूढी, चुकीच्या परंपरा व अंधश्रद्धा बंद करण्याचा उपदेश केला. रात्रंदिवस जनताजनार्दनासाठी एका गावातून दुसऱ्या गावात मजल, दरमजल कुठल्याही भौतिक सुविधा नसताना आपला देह चंदनासारखा शिजवला.

**"हरि भजनी हे ढवळील हे जग,**
**चुकविला लाग कळीकाळाचा."**

ज्या भागात मोठे महाराज जात त्या भागातील प्रत्येकाला भक्तीच्या सन्मार्गाला लावले महाराजाना प्रत्यक्ष पाहिलेले, त्यांचे अनुभव घेतलेले असंख्य लोक आजही हयात आहेत. त्यांचा शिष्यगण, त्यांनी घडवलेले अनेक कीर्तनकार, टाळकरी, वारकरी पंढरपूर व परभणी



जिल्ह्यातील दस्तापूरला या महात्म्याच्या पुण्यतिथीला न चुकता हजेरी लावतात. त्याचबरोबर राजकीय, सामाजिक व सर्व क्षेत्रातील लाखो, आबालवृद्ध भक्त येथे 'बाबांच्या समाधीच्या दर्शनाला येतात. संपूर्ण जीवन वारकरी सांप्रदायाला समर्पित करणारे वैराग्य मूर्ती संत मारोती महाराज दस्तापूरकर महाराज. डोंगर दऱ्यातून पायपीट करून या महात्म्याने भागवत धर्माची पताका सर्वत्र फडकवली.

मारोतराव महाराज म्हणजे शांतिब्रह्म एकनाथ महाराजांचे शांतीबाबतचे दुसरे रूप होते. मी १२ वर्षांचा असेल तेव्हा मला त्यांना प्रत्यक्ष जवळून पाहण्याचा व त्यांची सेवा करण्याचा योग आला. मला घातलेली माळ त्यांच्या हातची आहे. आमच्या मौजे देवकरा, ता. अहमदपूर या गावी ते सप्ताहात पाच दिवस सलग राहून कीर्तन व प्रवचन सेवा देत असत. पूर्ण दिवस ते मंदिरातच मुक्काम करत. मंदिरात आणलेलाच स्वयंपाक उपस्थित भक्तांबरोबर खात असत. आमचा सप्ताह हा अक्षय तृतीयेला उन्हाळ्यातच असायचा. त्यावेळी काही अशी विजेची व्यवस्था नव्हती. ना पंखे होते. तशातही ते मंदिरातच राहत असत. त्यांची राहणी साधी व उंच विचारसरणी होती. सुरुवातीचे अनेक वर्षे ते कीर्तन सेवेसाठी एका गावाहून दुसऱ्या गावाला बैलगाडीने प्रवास करून जात असत. दिवसात तीन चार कीर्तने करत असत. याकामी त्यांना रात्र दिवस असा भेद नव्हता. सतत परमार्थ सेवा करणे एवढेच लक्ष्य होते. ज्या गावात जात तेथे कीर्तनातून व्यसनमुक्त रहा, भांडण-तंटे करू नका, शिक्षणाला महत्त्व द्या, परमार्थ सेवा करा, संप्रदायाचे अनुयायी बना शुद्ध अंतकरणाने भक्ती करा असा संदेश देत असत. त्याकाळी आमचा भाग म्हणजे अनेक वन्य प्राण्यांची शिकार करून खाणारा व मोहाची दारू गाळून व्यसन करणारा समाज होता. गावात भांडणे झाली तर दगडांधोंड्यांशिवाय व्हायची नाहीत. एक प्रकारचे पशुतुल्य जीवन माणसे जगत होती. अशा माणसांना माणूस बनविण्याचे काम आमच्या भागात गुरुवर्य मोतीराम महाराज दस्तापुरकर, गुरुवर्य माधवबाबा मोळवणकर, गुरुवर्य मारोतराव महाराजांनी केले. आज आमच्या भागाइतके पारमार्थिक लोक आपणास इतरत्र पहावयास मिळणार नाहीत. इतके परिवर्तन घडून आले आहे. ते फक्त मारोती महाराज दस्तापुरकर यांच्यामुळेच झाले. महाराजांना आपला देह समर्पित करून २४ वर्ष झाली परंतु त्यांचा हा प्रवास खरोखर दीपस्तंभासारखा आहे.

**"काय वाणू आता न पुरे ही वाणी**
**मस्त चरणी ठेवितसे".**
**किंवा...**
**"वैराग्याच्या गोष्टी ऐकील्या त्या कानी**
**आत्ता ऐसे कोणी होणे नाही. "**

उत्तराधिकारी अच्युत महाराज दस्तापुरकर बाबांच्या मृत्यूनंतर मराठवाड्यात ही निर्माण झालेली पोकळी, पोरका झालेला समाज यांना आधार देण्यासाठी व बाबाचे नातु ह.भ.प. अच्युत महाराज दस्तापुरकर यांची उत्तराधिकारी म्हणून निवड झाली. बाबांचा वारसा पुढे चालू ठेवत त्यांनी पंढरपूर येथील मंदिराचे काम केले. ह.भ.प अच्युत महाराज हे महाराष्ट्रातील नामवंत, प्रत्येकाला आपले वाटणारे, भारदस्त आवाज, अभ्यासू प्रवचनकार व कीर्तनकार ही असलेले व्यक्तिमत्त्व आहे.

उद्धव बापू फड
संपर्क क्र. 9765588800

# काळा चहा व त्याचे फायदे

आधुनिक केसरी

तुम्हाला काळा चहा पिण्याचे कोणकोणते फायदे आपल्या शरीरास होत असतात, हे जाणून घेणार आहोत. काळा चहा पिण्याचे खूप सारे फायदे आपल्या शरीराला होत असतात, जे लोक काळा चहा पित नाहीत किंवा दूध टाकलेला चहा पितात त्या लोकाना सांगू इच्छितो की, ही सर्व माहिती वाचल्यानंतर आजपासून काळा चहा पिण्यास सुरवात कराल, अशी आम्हास खात्री आहे. जे लोक नियमितपणे काळ्या चहाचे सेवन करतात त्यांना सर्वात मोठा होणारा फायदा म्हणजे त्यांचा मेंदू तल्लक राहतो आणि याचे कारण असे आहे की कोरा चहा सेवन केल्याने आपल्या मेंदूला चांगल्या प्रकारे रक्त प्रवाह होतो.

रक्त प्रवाह वाढतो व तो वाढल्यामुळे परिणामी मेंदूच्या पेशी स्वस्थ राहतात, आणि त्यामुळेच आपल्या स्मरण शक्तिमध्ये वाढ होऊ शकते. जर तुम्हाला बौद्धिक कामे मोठ्यावर प्रमाणात असतील आणि जर तुमचा मेंदू थकून जाईल अश्या प्रकारची कामे करत असाल तर अशा बौद्धिक काम करणाऱ्या व्यक्तींनी आवर्जून काळा चहाचे सेवन करायला हवे.


याचा दुसरा एक फायदा म्हणजे ज्यांना खूप सारा तणाव आणि थकवा येतो लहान-सहान गोष्टीवरून जे टेंशन मध्ये येतात, अश्या लोकांनी देखील स्ट्रेस दूर करण्यासाठी काळा चहाचे नियमितपणे सेवन केल्याने तणाव आणि स्ट्रेस कमी करण्याचे काम हा काळा चहा करतो.

तिसरा फायदा आहे, तो म्हणजे कॅन्सरशी संबंधित, तुम्हाला तर माहीतच आहे की कॅन्सर चे प्रमाण खूप वाढले आहे, अगदी सेलिब्रेटींना देखील कॅन्सरने पछाडलेले आहे. आणि जर कॅन्सर पासून बचाव करायचा असेल तर आपण आपल्या आहारामध्ये काही पदार्थ घ्यायला हवेत आणि त्यातीलच एक महत्वाचा पदार्थ म्हणजे 'काळा चहा' आपण जर काळ्या चहाचे नियमितपणे सेवन केले तर, आपल्याला अनेक प्रकारच्या कॅन्सर्सपासून आपला बचाव होऊ शकतो. चौथा फायदा आपल्या ह्रदयाशी संबंधित आहे, जर तुम्हाला स्वस्थ ह्रदय हेवा असेल जर तुमच्या बॉडीमधील, रक्तातील कोरेस्ट्रॉल वाढले असेल तर तुम्ही देखील काळा चहा आजपासून घ्यायला सुरुवात करा. कारण या काळ्या चहामध्ये फ्लेवनहर्ट्स चे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे आणि फ्लेवनहर्ट्स मोठ्याप्रमाणात असल्यामुळे आपल्या रक्तातील कोरेस्ट्रॉलप्रमाण कमी होते. परिणामी रक्त गोठण्याची प्रक्रिया मंदावते आणि धमन्या निरोगी राहतात. धमन्या म्हणजे आपल्या शरीरामध्ये ज्या नसा दिसतात वरती त्यांच्या खाली धमन्या असतात त्या जर निरोगी राहिल्या तर आपले ह्रदय देखील निरोगी राहील. आणि परिणामी HEART ATTACK येण्याचे प्रमाण आपोआप कमी होते. पाचवा फायदा आहे पचनाशी संबंधितचा फायदा, जर आपल्याला GAS आणि ACIDITY चा त्रास असेल तर काळा चहा नियमितपणे सेवन करा, GAS आणि ACIDITY पासून आपला बचाव होईल. जर आपल्याला पोठदुखीचा त्रास होत असेल तर काळा चहा जास्त उखळा आणि हा चहा तुम्ही सेवन करा. त्यामुळे पोटदुखी देखील दहा ते पंधरा मिनिटात थांबून जाईल. पुढील सहावा आणि महत्वाचा फायदा म्हणजे स्किन प्रॉब्लेम.!! तुम्हाला स्किन प्रॉब्लेम माहीतच असतील त्यातील एक म्हणजे जर आपल्या चेहऱ्याला सुरतुक्या पडल्या असतील तर त्यावरती हा एक चांगला उपचार आहे.

तुम्ही नियमितपणे काळा चहा सेवन करा सुरतुक्यांचे प्रमाण कमी होईल, याला तुम्ही योगासन आणि प्राणायम यांची जोड देऊ शकता. काळ्या चहामध्ये अँटीऑक्सिडन्ट चे प्रमाण फार मोठे आहे आणि या अँटीऑक्सिडन्ट मुळेच त्वचेशी संबंधित जे कॅन्सर आहेत स्कीन कॅन्सर्स तर या त्वचेच्या कॅन्सर्स पासून आपला बचाव करण्याचे काम हा काळा चहा करत असतो.

-नितीन जाधव,
सुनील इनामदार

# राज्यपालपद... अपेक्षा व वास्तव!



आधुनिक केसरी

**राज्यपालपद हे एक घटनात्मक पद आहे असून त्यास घटनेत एक स्वतंत्र अधिष्ठान आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या शिफारशीवरून संविधांनाच्या अनुच्छेद १५५ अन्वये राज्याच्या  राज्यपालाची नियुक्ती राष्ट्रपतीकडून केली जाते. भारतीय संविधानानुसार राष्ट्रपतींचा प्रतिनिधी या नात्याने राज्यपाल काम करतात. राज्यपाल हे  घटकराज्य प्रशासनातील व्यवस्थेत एक घटनात्मक प्रमुख म्हणून आपले काम बघत असतात. अनुच्छेद १६३ अन्वये राज्यपालास आपले कार्याधिकार स्वविवेकानुसार वापरणे आवश्यक असेल तेवढी मर्यादा खेरीजकरून एरव्ही, सहाय्य करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी मुख्यमंत्री प्रमुखपदी असलेली एक मंत्रिपरिषद असते त्यामुळे  राज्यपाल हे राज्याचे घटनात्मक प्रमुख असले तरी राज्यपालांनी मंत्रिमंडळाच्या समन्वयानं आणि सल्ल्याने काम करणं अपेक्षित असतं कारण मंत्रिमंडळ हे लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधींचं असल्यानं त्यांचे अधिकार सर्वोच्च असतात.**

घटनासमितीत राज्यपाल पदाबाबत ज्यावेळी चर्चा झाली त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी या पदावर नियुक्त होणारी व्यक्ती अतिशय कार्यक्षम व सार्वजनिक जीवनात आदरणीय ठरलेली असावी, ती पक्षातीत असावी, ती घटक राज्याच्या राजकारणाच्या परिघाबाहेरील असावी तसेच ती सार्वजनिक जीवनात आपल्या वर्तनाने आदर्शाचे मापदंड निर्माण करण्यात यशस्वी झालेली असावी आदि अपेक्षा व्यक्त केल्या होत्या. राज्यपालांनी राष्ट्रपतींचे प्रतिनिधी म्हणून काम करावे; त्यांनी प्रशासनात हस्तक्षेप करू नये आणि मंत्रिमंडळाचा सल्ला मानून विधेयकावर सही करावी असे घटनाकारांना अपेक्षित होते. पण पुढे या अपेक्षांची पायम्मली करणाऱ्या अनेक घटना घडल्या व दुर्दैवाने आताही मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. अनेकदा राज्यपालांनी केंद्रस्थानी सत्तेवर असलेल्या पक्षाचे हित जपण्यासाठी या पदाच्या अधिकाराचा दुरुपयोग केल्याचे प्रामुख्याने आढळते. अनेक राज्यपाल घटनेने त्यांना बहाल केलेल्या स्वविवेकानुसार वापरायच्या अधिकाराच्या अनुषंगाने घेतलेल्या वादग्रस्त निर्णयांमुळे टीकेचे धनी ठरले आहेत.

केंद्रातील पूर्वीच्या सरकारांनी सुद्धा घटक राज्यात आपल्या मर्जीचे सरकार आणण्याकरिता वा विरोधंकांचे सरकार बरखास्त करण्याकरिता राज्यपाल पदाचा दुरुपयोग करून घेतल्याची काही उदाहरणे नक्कीच आहेत. रामलाल ठाकुर आंध्र प्रदेश चे राज्यपाल असतांना बहुमत असलेल्या एन.टी. रामराव यांचे तर कर्नाटकचे तत्कालीन राज्यपाल पी. वेंकटसुबैया यांनी एस. आर. बोम्मई यांचे तर उत्तर प्रदेश मध्ये राज्यपाल रोमेश भंडारी यांनी कल्याण सिंहच्या नेतृत्वातील सरकार तर हंसराज भारद्वाज यांनी कर्नाटक मध्ये बी.एस. येदियुरप्पा यांचे सरकार बरखास्त केल्याच्या घटना आहेतच. मात्र पार्टी विथ डिफरन्स म्हणविणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या केंद्रातील सरकारने चांगले पायंडे निर्माण करण्याऐवजी तोच कित्ता गिरवावा नव्हे तर अधिक जोरकसपणे राज्यपाल पदाचा दुरुपयोग करावा ही बाब निश्चितच राज्यपालपदाची भरपूर अवहेलना करणारी तर आहेच पण भारतीय लोकशाहीकरिता सुद्धा अत्यंत घातक आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ वर्षांपूर्वी सत्ता मिळवताच राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आणि ताकदीच्या असलेल्या राज्यांमधील अगोदरच्या सरकारने नियुक्त केलेल्या राज्यपालांची तातडीने उचलबांगडी करून आपल्या मर्जीतील व्यक्तींची नियुक्ती केली. केंद्रातील सत्ताधारी पक्षाने असे करणे एक वेळ समजू शकते पण त्यांनी नियुक्त केलेल्या मणीपुर, अरुणाचल प्रदेश, उत्तराखंड, मेघालय, गोवा, बिहार, झारखंड,प. बंगाल, महाराष्ट इत्यादी राज्यांच्या राज्यपालांच्या आक्षेपार्ह वर्तनाचे कोणत्याही प्रकारे समर्थन केले जाऊ शकत नाही.

किरण बेदी यांची पाँडिचेरीचे नायब राज्यपाल म्हणून वादग्रस्त कारकिर्द, पश्चिम बंगालचे राज्यपाल जगदीप धनकर यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पदभार स्वीकारल्यापासून निर्माण केलेल्या अडचणी, मार्च २०१६ मध्ये उत्तराखंडमध्ये राज्यपाल के. के. पॉल यांनी तर अरुणाचल प्रदेशात राज्यपाल जे.पी. राजखोवा यांनी मोदी सरकारला राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्याची केलेली अनावश्यक शिफारस, २०१७ मध्ये गोव्यात ४० जागांच्या विधानसभेत १७ जागा जिंकणारा काँग्रेस सर्वात मोठा पक्ष असतांना सुद्धा राज्यपाल मृदुला सिन्हा यांनी भाजपला सरकार स्थापनेचे दिलेले निमंत्रण, तसेच मणिपूरमध्ये सुद्धा ६० सदस्यांच्या विधानसभेत, काँग्रेस २८ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला असतांनाही राज्यपाल नजमा हेपतुल्ला यांनी प्रथम भाजपला बहुमत सिद्ध करण्यासाठी दिलेले निमंत्रण, २०१७ मध्ये राज्यपाल केशरीनाथ त्रिपाठी यांनी सर्वात मोठा पक्ष आरजेडीच्या दाव्याकडे दुर्लक्ष करून भाजपसोबत युती करणाऱ्या नितीश कुमार यांना केलेलं मुख्यमंत्री या सर्व बाबी घटनेतील तत्वे आणि तरतुदींची पायमल्ली करणाऱ्या तसेच चिंताजनक व चीड आणणाऱ्या तर आहेतच पण राज्यपाल पद रद्द कराव या मागणीपर्यंत नेणाऱ्या सुद्धा आहेत हे लक्षात घ्यायला हवे. अशा प्रकारांमुळे राज्यपालपद हे फक्त विरोधी पक्षातील सरकार आणि मुख्यमंत्र्यांना हैराण करण्यासाठीच केंद्र पुरस्कृत आहेत का? राज्यपाल फक्त विरोधी पक्षाचे पुरेपूर दमन करण्यासाठीच नियुक्त केले जातात का? अशी शंका संवेदंशील नागरिकांना आल्याशिवाय राहत नाही. महाराष्ट्रातील विद्यमान राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे तर नियुक्ती झाल्यापासूनचे जे वर्तन आहे ते नैतिकतेला धरून आहे असे निश्चितच वाटत नाही. महाविकास आघाडीच्या सरकारच्या कुरापती काढण्याची, सरकारनं घेतलेल्या वेगवेगळ्या निर्णयांवर कोंडीत पकडण्याची एकही संधी त्यांनी सोडलेली दिसली नाही.

महाराष्ट्रात विजयालक्ष्मी पंडित, डॉ शंकरदयाल शर्मा, अलीयावर जंग, सादिक अली, एयर चीफ मार्शल ओ.पी. मेहरा, एयर चीफ मार्शल आय. एच. लतीफ, डॉ पी.सी. अलेक्झांडर, मोहम्मद फजल, एस. एम. कृष्णा, एस. सी. जमीर आदि मान्यवरांनी राज्यपाल पदाला न्याय देण्याचे व या पदाची प्रतिष्ठा जोपासण्याचे काम केले आहे. त्यामुळे एक गौरवशाली व उज्ज्वल परंपरा या राज्याला लाभली आहे. वर्तमान राज्यपालांचे आतापर्यंतचे एकूणच वर्तन मात्र या परंपरेला छेद देणारे राहिलेले आहे असे वाटते. त्यांची महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून आतापर्यंतची एकूणच कारकिर्द अत्यंत वादग्रस्त राहिल्याचे दिसते. २०१९ च्या निवडणुकी नंतर शिवसेनेनं राज्यपालांना भेटून सत्तास्थापनेचा दावा केला होता आणि यादी सादर करण्यासाठी मुदतही मागितली होती. मात्र राज्यपालांनी त्यांना एक दिवसाचाही वेळ दिला नाही. वास्तविक पाहता सरकार स्थापन होत असेल तर त्यासाठी आवश्यक वेळ देणं गरजेचं होत मात्र त्यांनी राज्यात राष्ट्रपती लागवट लागू करण्याची शिफारस केली. राष्ट्रपती राजवट लागू करण्याची एवढी घाई करण्याची  खर म्हणजे अजिबात गरज नव्हती. शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसतर्फे  उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होतील असं जाहीर केल्यानंतर तातडीने राष्ट्रपती राजवट हटवून अवघ्या बारा तासांत पहाटेला पार पडलेल्या देवेंद्र फडणवीस- अजित पवार यांच्या मुख्यमंत्री, उप-मुख्यमंत्री पदाच्या शपथविधी मधली राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भूमिका संशयास्पद व वादग्रस्त ठरली.उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यावर मंत्रीमंडळाने शिफारस करून व वारंवार विनंती करून सुद्धा उद्धव ठाकरेंची आमदार म्हणून नेमणूक करायला त्यांनी केलेला विरोध, कोरोनामुळे विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला विरोध, कोरोनाविषयीच्या प्रशासकीय कामांमध्ये त्यांचा हस्तक्षेप, भाजप नेत्यांपासून अगदी कंगना राणावत, पायल घोषसारख्या अभिनेत्रींच्या भेटीगाठी अशा अनेक बाबींमुळे राज्यपाल पक्षपाती भूमिका घेत आहेत का? राजभवन हे समांतर सत्ताकेंद्र झालं आहे का? अशा शंका उपस्थित करायला वाव मिळाला. कोरोना काळात प्रार्थनास्थळं उघडण्यासंदर्भात राज्यपालांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लिहिलेल्या पत्रात "तुम्ही हिंदुत्वाचा पुरस्कार करता. मात्र, मला असा प्रश्न पडतो की, तुम्हाला दैवी पूर्वसूचना मिळाली आहे की काय? तुम्ही वेळोवेळी राज्यातील प्रार्थनास्थळं उघडणे पुढे ढकलता. का तुम्ही अचानक सेक्युलर झाला आहात?" ही वापरलेली भाषा व वाक्ये यावरुन सुद्धा वाद झाला. भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेत सेक्यूलर हा  शब्द समाविष्ट आहे. त्यामुळे, घटनात्मक पदावर असलेल्या आणि राज्यपाल म्हणून आपल्या पदाचे कार्यपालन निष्ठापूर्वक करीन आणि माझ्या संपूर्ण क्षमतेनिशी संविधान व कायदा यांचे जतन, संरक्षण व प्रतिरक्षण करीन अशी शपथ घेणाऱ्या व्यक्तीने अशी भूमिका घेणं योग्य नाही अशी भूमिका घेत अनेक घटनातज्ज्ञांनी राज्यपालांनी हे पत्र पाठवून लक्ष्मणरेषा ओलांडली असल्याचं मत व्यक्त केलं होतं.

प्रा. अंबादास मोहिते
संपर्क क्र. 9422190871

महाविकास आघाडी सरकारच्या मंत्रिमंडळाने शिफारस करून सुद्धा व सरकारच्या शिष्टमंडळाने अनेकदा राज्यपालांच्या भेटी घेऊनही आणि उच्च न्यायालयाने याबाबत लवकरात लवकर आवश्यक कार्यवाही करावी असे निर्देश देऊनही विधानपरिषदेवर राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या नियुक्तीची प्रक्रिया त्यांनी पूर्ण केली नाही. घटनेत किती दिवसात या नियुक्त्या करायला हव्यात याबाबत निश्चित अशी कालमर्यादा दिली नाही म्हणून वरिष्ठ सभागृहातील तब्बल १२ जागा एखादे राज्यपाल रिक्त ठेवतील असे घटनाकारांनासुद्धा कधी स्वप्नातही वाटले नसेल.  विधानसभा अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठीही महाविकास आघाडीच्या नेत्यांनी राज्यपालांची वारंवार भेट घेतली होती परंतु त्यांनी निर्णय घेण्यास टाळाटाळ केली आणि आता भाजपा चे सरकार आल्याबरोबर लगेच विधानसभा अध्यक्षपदाची निवडणूक घेतली व ती देखील आवाजी मतदानाने. राजभवनावर शपथ विधीच्या अगोदरच भावी मुख्यमंत्र्यांना पेढा भरवणारे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी महाराष्ट्राच्या तरी इतिहासातील कदाचित पहिलेच राज्यपाल असावे. उद्धव ठाकरे सरकारच्या मंत्रिमंडळाच्या शपथविधीदरम्यान काही मंत्र्यांनी शपथ घेताना शपथेबाहेरील शब्द उच्चारले होते. त्यावरून नाराज झालेल्या राज्यपालांनी काँग्रेसचे के.सी. पडवी यांना पुन्हा शपथ घेण्यास सांगितलं होतं. इतकंच नाही, तर कार्यक्रमानंतर राज्यपालांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना पत्र लिहून याबाबत नाराजीही व्यक्त केली होती. मात्र नुकत्याच झालेल्या शपथविधीच्यावेळी मुख्यमंत्र्यांनी शपथ घेताना शपथे व्यतिरिक्त शब्द उच्चारले तरी त्यांनी कोणतीही हरकत घेतली नाही, अशी विविध उदाहरणांवरून राज्यपालांचे पक्षपातीपण धोरण अधोरेखित होतांना दिसते आणि राज्यपाल कट्टर भाजपा समर्थक असल्यामुळे महाविकास आघाडी सरकारला त्यांनी कायम विरोध केला असे म्हणण्यास वाव मिळतो.

मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार छत्रपती शिवाजी महाराज व रामदास स्वामी यांची भेट झाल्याचा कोणताही पुरावा नाही, असे असतांना राज्यपालांनी रामदास शिवरायांचे गुरु होते असे विधान करणे, तसेच महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या बालविवाहा बद्दल टर उडविणे याबाबींमुळे कुठे, कधी व काय बोलावं याच भान नसणारा राज्यपाल लाभला हे महाराष्ट्राचे दुर्दैव असल्याची टीका त्यांनी स्वःतावर ओढवून घेतली. राज्यपालांनी आपला निधी कोणत्या संस्थांना द्यावा, याबाबतचे संकेतही डावलल्याचंही पाहायला मिळालं. राज्यपाल सारख्या घटनात्मक पदावरील व्यक्तीकडून अशा बाबी होणे नक्कीच क्लेशकारक आहे. राज्यपाल पदावरील महाराष्ट्राचे वर्तमान राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचेतर्फे घटनात्मक चौकटीत राहून राज्यपालपदाच्या अनुषंगाने योग्य रुढी, संकेत अथवा परंपराचे पालन करण्यात आले असते, राज्य सरकार सोबत योग्य संवाद ठेवण्यात आला असता तर राज्यपालपदाच्या आजपर्यंतच्या वाटचालीत निर्माण झालेल्या अनेक वादांना पूर्णविराम मिळाला असता व कटुता टाळता आली असती तसेच केंद्रशासन व घटकराज्य शासन यांना जोडणारा दुवा म्हणून या पदाची प्रतिष्ठा देखील वाढली असती असे वाटते. राज्यपाल व मुख्यमंत्री दोघांनीही परस्परांच्या पदाचा व अधिकारांचा सन्मान केला असता तर निश्चितच त्यांच्या नात्यात सामंजस्याचे व सौहार्दाचे नाते प्रस्थापित झाल्याचे महाराष्ट्रातील जनतेला पाहायला मिळाले असते.

संविधानाची रक्षा करण्याची शपथ घेऊन संवैधानिक पदावर आरुढ होणाऱ्या व्यक्तीने निष्पक्ष आणि तटस्थ आचरण करणे हे त्याच संवैधानिक दायित्व असल्यामुळे संविधानच्या प्रतिच्या निष्ठेला सदैव आपल्या पक्षाच्या निष्ठेच्या वर ठेवणे अपेक्षित आहे. मात्र या अपेक्षांवर पानी फेरले गेल्यास राज्यपाल हे केंद्र सरकारचे वा विशिष्ट पक्षाचे एजेंट वा कठ्पुतली आहेत असे आरोप होतात. केंद्रात एका पक्षाचे सरकार व घटक राज्यात दुसऱ्या पक्षाचे सरकार आणि राज्यपालांची नियुक्ती केंद्रातर्फे त्यामुळे त्याची मर्जी न सांभाल्यास केंव्हाही पदावरून उचलबांगडी होऊ शकते वा पुढे कोणतेही राजकीय वा प्रशासकीय पद मिळणार नाही मुख्यत्वेकरून या भीतीपोटी राज्यपाल पदावरील व्यक्ति आपली पक्षनिष्ठा दाखविण्याकरिता घटक राज्य सरकार सोबत पक्षपातीपणा करते असे निदर्शनास येते.

देशात राज्यपाल पदाच्या माध्यमातून पूर्वी व आताही ज्या पद्धतीने लोकशाहीची थट्टा सुरु आहे ते पाहता खरोखरच या पदाची आवश्यकता आहे का असा प्रश्न निर्माण होतो. केंद्रशासन व घटकराज्य शासन यांना जोडणारा सेतु म्हणून हे पद जर आवश्यक आहे तर या पदावरील व्यक्तीकडून आचरण विषयक फक्त अपेक्षा न करता या पदाच्या अनुषंगाने पुढील काही वैधानिक बाबी करणे गरजेचे वाटते. १) राज्यपालाची नेमणूक ही घटकराज्य मंत्रिमंडळाच्या संमतीने केली जावी किंवा राज्यपाल लोकनियुक्त असावे. २) राज्यपाल पदावरून पायउतार झालेल्या व्यक्तीला राजकारणात व प्रशासनव्यवस्थेत कोणतेही पद देण्यात येऊ  नये, ३)राज्यपालांनी वापरलेल्या अधिकाराचे न्यायिक पुनर्विलोकन  होण्याची तरतूद हवी, ४) राज्यपालांनी स्व-विवेकानुसार करावयाच्या कृती संदर्भात मार्गदर्शक तत्वे असायला हवीत, ५)  राज्यपाल राष्ट्रपतींची मर्जी असे पर्यन्त पद धारण करेल ही तरतूद रद्द करावी व त्यांना ५ वर्षाचा कालावधी पूर्ण करू द्यावा. केंद्रातील सरकार बदलले तरी त्यांची उचलबांगडी करू नये  मात्र ठोस व सबल कारण असल्यास नियुक्ती रद्द करण्याचे राष्ट्रपतींना अधिकार असावेत. ६) राज्यपाल पदाकरिता एक आदर्श आचार-संहिता तयार करण्यात यावी.

अर्थात फक्त हे झाल्याने राजकीय क्षेत्रात सुधारणा होतील असे समजणे चुकीचे ठरेल. आता गरज आहे ती जनतेने "मला काय त्याचे" ही भूमिका सोडून जागरूक होवून आवाज उठविण्याची व दबाव निर्माण करण्याची जेणेकरून राजकारणात सुरू असलेल्या एकूणच गैरप्रकारांवर अंकुश लागेल व आपल्या देशातील लोकशाही अधिक बळकट व समृद्ध होऊ शकेल.

# समलैंगिकता आणि भारतीय चित्रपट



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**समलैंगिक संबंध हा खरं तर संवेदनशिल विषय. फ्रान्स, यूएसए, यूके आणि न्यूझीलंड मध्ये समलिंगी विवाहाला परवानगी आहे. तर नेपाळ आणि चीन मध्ये समलैंगिक संबंध हा आता गुन्हा नाही मात्र इराणच्या कायद्यात यासाठी मृत्यूदंड आहे. सहमतीचा समलैंगिक संबंध म्हणजे गुन्हा नाही हे ठरवणारा भारत हा नेपाळनंतर दक्षिण आशियातील दुसरा देश. हा निर्णय येऊन जवळपास चार वर्षेच झाली आहेत. समलैंगिक समुदाय भावना, सत्य, सामाजिक मर्यादा, परंपरा, समानता आणि कायदा यांच्या या चक्रात आजही अडकलेला दिसून येतो. समाज आणि चित्रपट हे नाते परस्परपूरक आहे हे सर्वश्रुत आहेच. समाजाचे प्रतिबिंब चित्रपटात आणि चित्रपटाचा प्रभाव समाजावर असे ते समीकरण आहे.**

समलैंगिक संबंधांवर आधारीत चित्रपट बनवणं हा हिंदी चित्रपटसृष्टीसाठी अनेक वर्षांपासून नाजूक आणि क्लिष्ट मुद्दा राहिलेला आहे. पूर्वी अशा विषयावर चित्रपट बनवण आणि प्रदर्शित करण हे एकप्रकारच धाडसच होत. सुरूवातीच्या काळात अशा चित्रपटांना बऱ्याच प्रश्नांना सामोरे जावे लागले. अनेकदा त्यावरून वादही झाले. चित्रपटांवर बंदीचे सावटही आले. त्या काळी समलैंगिक संबंध हा विषय तितक्या सहजतेने स्वीकारला जाणारा नव्हताच. समलैंगिक संबंध हा शब्द उघडपणे उच्चारायची देखील सोय नव्हती. समाजात तेवढी प्रगल्भता नव्हतीच. तरीही सिनेसृष्टीने धाडस करायचे सोडले नाही. कालांतराने समाजाच्या विचारधारेत हळूहळू बदल होऊ लागला. हा प्रवास साधा, सोपा मुळीच नव्हता. अनेक अडथळे पार करत पूर्वी आक्षेपार्ह वाटत असलेला मुद्दा आता मात्र स्वागतार्ह झाला आहे. १९९६ च्या 'फायर' ते २०१९ च्या 'इक लडकी को देखा तो ऐसा लगा' पर्यंतच्या प्रवासाला जवळपास २३ वर्षं लागली.

फायर (१९९६), दरमियां (१९९७), तमन्ना (१९९७), माय ब्रदर निखिल (२००५), अलीगढ (२०१४), इक लडकी को देखा तो ऐसा लगा (२०१९), बधाई दो (२०२२) हे समलैंगिकतेवर आधारित चित्रपट. १९७१ मध्ये प्रदर्शित झालेला 'बदनाम गली' हा समलैंगिकतेच्या विषयाला स्पर्श करणारा पहिला हिंदी चित्रपट म्हणता येईल. यात समलैंगिकतेचं थेट चित्रण करण्यात आलेलं नव्हतं पण यातील कथा ही समलैंगिकतेच्या विषयाला स्पर्शकरणारी होती. त्यावेळी असलेल्या सामाजिक वातावरणामुळे कदाचित चित्रपट निर्मात्याला एवढच स्वातंत्र्य मिळाले असेल. अगदी ९० च्या दशकापर्यंत चित्रपटात समलैंगिक पात्र असेल तर अगदी दबकतच दाखवल जायच, लेस्बियन पात्र दाखवण तर दुरच.

१९९५ मध्ये 'अधुरे' नावाच्या चित्रपटात मात्र समलैंगिकताहा विषय उघडपणे मांडण्यात आला होता. इरफान खाननं या चित्रपटात मुख्य भूमिका



केली होती. मात्र हा चित्रपट सेन्सॉर बोर्डाच्या कात्रीत अडकला आणि सेन्सॉर बोर्डाने या चित्रपटास परवानगी नाकारल्याने हा चित्रपट प्रदर्शित होवू शकला नाही. पूर्वी अशी पात्र चित्रपटात असतील तर ती केवळ चेष्टेचा विषय म्हणून किंवा नकारात्मक भूमिकेत असायची. १९९६ मध्ये आलेल्या 'फायर' या चित्रपटामुळे सामजिक गदारोळ निर्माण झाला होता. हा चित्रपट त्या काळाच्या बराच पुढचा होता. या चित्रपटात दोन समलैंगिक स्त्रियांची कथा दाखवण्यात आली होती. समाजातील एका वर्गाने या चित्रपटाचे स्वागत केले होते तर दुस-या वर्गाने विरोध. या वादाला राजकीय रंग लागला आणि चित्रपटाचा वाद चिघळतच गेला. पण या चित्रपटामुळे समलैंगिकतेवर बोलण्यास सगळ्यांना प्रवृत्त केलं. पुरुषसत्ताक मानसिकतेला आव्हान देणारं यापेक्षा मोठं काय असू शकतं, जिथं स्त्रिया म्हणतात की त्यांना पुरुषांची गरज नाही. स्वतःला लेस्बियन समजणाऱ्या स्त्रिया आजही समाजात खालच्या स्तरावर आहेत. दोन पुरुषांची प्रेमकथा सांगण्यापेक्षा दोन स्त्रियांची प्रेमकथा सांगणे जास्त जोखमीचं आहे. अशाच वादाची झळ लागली ती 'गर्लफ्रेंड' या सिनेमाला. १९९७ मध्ये आलेला महेश भट्टचा 'तमन्ना' हा चित्रपट सत्यकथेवर आधारित होता. यात परेश रावल यांनी समाजापासून दूर, भावना असलेल्याएका ट्रान्सजेंडर व्यक्तीरेखा साकारली होती. त्याला एक मुलगी आहे असं दाखवण्यात आलं होत. पण ती मुलगी एका ट्रान्सजेंडरला तिची आई किंवा वडील म्हणून स्वीकारू शकेल का ? असा या चित्रपटाचा आशय आहे. माय ब्रदर निखिल' या सिनेमाचेही तसेच झाले. एचआयव्हीग्रस्त व्यक्तीवर हा सिनेमा बेतला होता. पण त्यात समलैंगिक संबंधावरही भाष्य केले होते. सिनेमा २००५ मध्ये प्रदर्शित झाला असला तरी त्यातील कथानक १९८७ ते १९९४ या काळातले होते. त्यामुळे त्या काळातील अशी गोष्ट दाखवणे धाडसाचेच होते.

'इक लडकी को देखा तो ऐसा लगा' या चित्रपटाची कथा लिहिणारी गझल धालीवाल स्वतः एक ट्रान्सवूमन आहे, म्हणजेच शस्त्रक्रियेनंतर तिचं रूपांतर पुरुषातून स्त्रीमध्ये झालं आहे. गझल ही मुलगा म्हणून जन्माला आली पण तिला मुलीसारखं व्हायचं होतं. ती पुरूषाच्या शरीरात कैद झाली आहे असं तिला वाटायच. तिच्या पालकांनी तिच्या या भावनेकडे दुर्लक्ष केल. मात्र हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर मात्र तिला तिच्या पालकांनी मुलगा म्हणून स्विकारल आणि लिंग बदलाची शस्त्रक्रिया करण्याची परवानगी दिली. गझल सारख्या माणसांच्या सत्य परंतु कधीही गांभिर्याने न घेतलेल्या कथा आज पडद्यावर येत आहेत. 'मार्गेरिटा विथ ए स्ट्रॉ' मध्ये एका अपंग मुलीच्या लैंगिक इच्छेचा शोध घेण्यात आलाय. तर २०२२ च्या 'बधाई दो' मधील सुमी लेस्बियन आहे. २०२१ मध्ये आलेला पहिला व्यावसायिक चित्रपट 'चंदीगढ करे आशिकी' ही गझल धालीवाल सारख्या ट्रान्सवुमनची कथा आहे. शुभ मंगल ज्यादा सावधान' या चित्रपटात कार्तिक सिंग (आयुष्मान खुराना) समलिंगी आहे. 'अलीगढ' सारख्या चित्रपटांशी जोडलेले पटकथा लेखक अपूर्व असरानी यांनी ८० आणि ९० च्या दशकातील मुंबईतील समलैंगिक तरुणाची, स्वतःची कथा सादर केली आहे. मराठीमध्ये 'बायोस्कोप' या चित्रपटात, रवि जाधव दिग्दर्शित 'मित्रा' या लघुपटातही समलैंगिक संबंधांचा विषय मांडला आहे. या लघुपटाला राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला आहे. चित्रपटात ज्याप्रकारे तो विषय मांडला आहे त्याचे प्रेक्षकांकडून कौतुक झाले. इंटरनेट आणि ओटीटीच्या आगमनापासून मात्र आता समलैंगिक समुदायाच्या समस्या आणि सामाजिक परंपरांसोबतचा त्यांचा संघर्ष याविषयीचे चित्रपट, शॉर्ट फिल्म तयार केल्या जात आहेत. चित्रपटानंतर अनेक वेब सीरिजनेही हा विषय उचलून धरला.  पूर्णतः याच विषयावर वेब सीरिज आधारित नसली तरी बऱ्याचशा उपकथानकांमध्ये हा मुद्दा येतोच. 'मेड इन हेवन', 'फोर मोअर शॉर्ट्स प्लीज', 'ट्विस्टेड', 'सॅक्रेड गेम्स', 'सिटी ऑफ ड्रीम्स' असा वेब सीरिजमध्येही समलैंगिकता हा विषय काही प्रमाणात मांडला आहे. आपल्याला आयुष्यात दररोज लढाई लढायची असते. पण कुटुंबासोबत होणारी लढाई ही सगळ्यांत धोकादायक असते. समलैंगिक व्यक्तींची लढाई कुटुंबापासून सुरू होते आणि समाजापर्यंत येऊन पोहचते. चित्रपटांमध्ये चित्रित केलेल्या कुटुंबांप्रमाणेच वास्तवातील कुटुंब आणि समाज या मुद्द्यावर तितकेच विभागलेले आहेत. शतकानुशतके चालत आलेले कौटुंबिक कलह आणि नव्या युगातील कायदेशीर सत्य, आजही काहीवेळा एकमेकांसमोर येताना दिसतात. समलैंगिकांना कोणीही समजून घेत नाही. ते वेगळे आहेत त्यामुळे ते समाजाला विकृत वाटतात. पण हळूहळू समाजातील समलैंगिक संबंधांबद्दलची समजूत काही अंशी का होईना बदलत गेली. याचा प्रत्यय गेल्या १०-१२ वर्षांत या विषयावरील आलेल्या चित्रपटांना मिळालेल्या प्रतिसादावरून येतो. मुळात समलैंगिक संबंधांना स्वीकारण्याआधीही गरज होती ते समजून घेण्याची, ते नेमके का आणि काय आहे हे जाणून घेण्याची. हेच नेमके आता घडू लागले आहे. तसेच, चित्रपटातून अशा विषयांची मांडणी अत्यंत संवेदनशीलतेने केली आहे. प्रेक्षकांनी ही संवेदनशीलता समजून घ्यायला सुरूवात केली आहे आणि याचीच परिणती ते स्वीकारण्यात दिसून येतेय.

# सरस्वती भुवन शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचे पुण्यात संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कडक शिस्त, अभ्यासाचा तास, वर्गात शिक्षक अनुपस्थित असताना केलेला धिंगाणा, शाळेची घंटा झाल्यावर अतिशय उत्साहाने घराकडे वळणारी पावले अशा जालन्याच्या सरस्वती भुवन शाळेच्या पन्नास वर्षांपूर्वीच्या आठवणीने एकत्रीकरण कार्यक्रम खूप रंगला. सरस्वती भुवन जालन्याच्या १९७१ बॅचच्या ११ वी (मॅट्रिक) च्या विद्यार्थ्यांनी पुण्यातील आंबेगाव येथील प्रतिकृती लेक व्ह्यू रिसॉर्टमध्ये १८-१९ जून रोजी निवडक विद्यार्थ्यांचे व विद्यार्थिनींचे एकत्रीकरण व स्नेहभोजन कार्यक्रम आयोजिला होता.

सर्वांनी कॅरम, बुद्धिबळ, टेबल टेनिस खेळून आनंद व्यक्त केला. सुरुवातीला कुटुंबियांचा परिचय झाला. शालेय जीवनातील जुन्या आठवणी सांगितल्या गेल्या. रेन-डान्सचा पण सर्वांनी आनंद घेतला.

सखाराम देशपांडे, सीमा भावे, विनायक मेहेंदळे, ऍड सुनील किनगावकर,पद्मा पांगारकर यांनी ह्या मैत्रीपूर्ण संस्मरणीय अनुभव सोहळा यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेतला.



**संमेलनाला उपस्थित उभे असलेले डावीकडून संजीवन पाटणकर, अविनाश पाठक, सुभाष काळे, विनायक मेहेंदळे, अशोक आगलावे, विनायक साखरे, सखाराम देशपांडे, बाळकृष्ण देशपांडे, सुनील किनगावकर, लक्ष्मीकांत बळद, तर खुर्च्या वर बसलेल्या डावीकडून सीमा भावे, संध्या बळद, चंचल काळे, तृप्ता मेहेंदळे, विजया पाटणकर, विमल आगलावे, शुभांगी अग्निहोत्री, आरती केतकर, पद्मा पांगारकर, अनुजा कुलकर्णी, जयश्री देशपांडे, मेघा किनगावकर, तनुजा देशपांडे आदी.**

संजीवन पाटणकर, अविनाश पाठक सुभाष काळे, विनायक मेहेंदळे, अशोक आगलावे, विनायक साखरे, सखाराम देशपांडे, बाळकृष्ण देशपांडे, सुनील किनगावकर, लक्ष्मीकांत बळद, सीमा भावे, सौ. संध्या बळद, सौ. चंचल काळे, सौ. विजया पाटणकर, सौ. तृप्ता मेहेंदळे. सौ. विमल आगलावे, शुभांगी अग्निहोत्री, आरती केतकर, पद्मा पांगारकर, अनुजा कुलकर्णी, जयश्री देशपांडे, सौ. मेघा किनगावकर, सौ. तनुजा देशपांडे ह्यांनी ह्या आनंदी सोहळ्यात सहभाग नोंदवला.

अनेक वर्षांनी शाळेतले आपले सवंगडी सहकुटुंब समोर आले आणि एकमेकांमध्ये झालेले बदल हाच एक मोठा चर्चेचा, विनोदाचा आणि गप्पांचा विषय झाला. या वेळी ॲड. सुनील किनगावकर लिखित हास्यरंग पुस्तकाचे वितरणही करण्यात आले. एकमेकांचे सुख दुःख जाणून घेतांना आपण आयुष्यात किती काय काय केले याची प्रचिती झाली. सर्वांनी एकत्र बसून सहकुटुंब जेवण घेतले आणि केकही कापला त्यावर ऋणानुबंध असे सार्थक नाव पण लिहिले होते. यापुढे अधिकाधिक जालन्याच्या सरस्वती भुवन हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना संपर्क करून अजून कार्यक्रम करण्याचा संकल्प करण्यात आला.

# वरुड येथे १०१ दिव्यांगांना मोफत कृत्रिम अवयवांचे वाटप

## आ. देवेंद्र भुयार यांच्या पुढाकारामुळे शेकडो दिव्यांग बांधवांना मिळाला दिलासा !

आधुनिक केसरी न्यूज

**वरुड :** शेतकरी भवन कार्यालय वरुड येथे आमदार देवेंद्र भुयार यांच्या हस्ते १०१ दिव्यांग बांधवांना मोफत "कृत्रिम अवयव" वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. अनेक दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम हात, पाय विकत घेणे शक्य होत नाही ही बाब लक्षात घेत आमदार देवेंद्र भुयार यांनी वरूड येथे आमदार देवेंद्र भुयार मित्र मंडळ व वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ५ जून रोजी मोफत कृत्रिम हात-पाय (जयपूर फूट) कृत्रिम अवयव शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये सहभागी झालेल्या १०१ लाभार्थ्यांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून हात-पायांचे माप घेण्यात आली होती.

दुर्घटनेत हात-पाय गमावणारे, मधुमेहाने त्रस्त, रक्तवाहिनींच्या विकाराने पीडित व्यक्ती आणि गँगरीन झालेल्या व्यक्ती सर्वसामान्य जीवन जगण्यात असमर्थ असतात. अशा व्यक्ती कृत्रिम हात-पायांच्या सहाय्याने सामान्य जीवन जगू शकतात. सर्वसामान्यांप्रमाणे चालू फिरू शकतात. सर्व कामकाज करू शकतात. एवढेच नव्हेतर सायकल, रिक्षा चालवू शकतात. त्यांना पळता, खेळताही येते. तसेच नृत्यही करता येते. आमदार देवेंद्र भुयार यांच्या प्रयत्नाने या शिबिरातून अपंग नागरिकांना सामान्य जीवन जगण्याची मदत तसेच उमेद मिळाली



असून शेकडो अपंग बांधवांना दिलासा मिळाला आहे. वेगवेगळ्या अपघातांत हात किंवा पाय गमावलेल्यांच्या आयुष्यात नवी उमेद जागविण्याचे काम मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्र भुयार करत असून दिव्यांगांना आधार देण्यासाठी कृत्रिम अवयव व सहायक साधने देण्यासाठी आमदार देवेंद्र भुयार मित्र परिवार व साधू वासवाणी मिशन यांनी पुढाकार घेतला आहे. या शिबिराच्या माध्यमातून शेकडो दिव्यांग गरजूंची तपासणी करून मोठ्या प्रमाणात साहित्य देण्याचे लक्ष हाती घेण्यात आले होते.

दिनांक १० जुलै रोजी आमदार देवेंद्र भुयार यांच्या पुढाकारामुळे या भव्य शिबिराच्या माध्यमातून शेकडो अपंग व्यक्तींना कृत्रिम हात, पाय बसविण्यात आले असल्यामुळे १०१ दिव्यांग व्यक्तींना निश्चितच जगण्यासाठी नवी उभारी मिळेल असा विश्वास आमदार देवेंद्र भुयार यांनी यावेळी व्यक्त केला असून शेकडो दिव्यांग बांधवांनी आमदार देवेंद्र भुयार यांचे आभार मानले.

# अहमदनगर येथे ‘पद्मगंगा’च्या साहित्य पुरस्काराचे वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**आष्टी :** भिंगार येथील पद्मगंगा फाउंडेशनतर्फे दिल्या जाणाऱ्या साहित्य पुरस्काराचे शनिवारी ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. मुस्साअली बागवान यांच्या हस्ते दिमाखात वितरण करण्यात आले. लोकसाहित्याचे अभ्यासक गंगाधर मोरजे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पद्मगंगा फाउंडेशनतर्फे दरवर्षी साहित्यातील उकृष्ट कलाकृतींना राज्यस्तरीय पुरस्कार दिले जातात. शनिवारी हमाल पंचायतीच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. मुस्साअली बागवान होते. तर, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विजय खन्ना होते. कोविड काळामुळे गेली दोन वर्षे पुरस्कार वितरण कार्यक्रम घेता आला नाही. त्यामुळे काल 2020, 2021, 2022 अशा तीन वर्षांचे पुरस्कार वितरण एकाच वेळी करण्यात आले. यामध्ये लोकसाहित्य - प्रा. डॉ. राजाराम सोनटक्के, संशोधन - प्रा. डॉ. रमेश खिळदकर, पत्रकारिता - जावेद गफुरखान पठाण, 2021 : समिक्षा - प्रा. डॉ. सुधाकर शेलार, कादंबरी - पत्रकार अशोक निंबाळकर, सामाजिक - लक्ष्मण ऐतवालड, 2022 : काव्य - डॉ. ज्योती रहाळकर, गझल काव्य - प्रसाद कुलकर्णी, संतकाव्य - हभप मारोती चोंडीकर, शैक्षणिक - प्रा. डॉ. गोपीनाथ बोडखे यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी डॉ. बागवान म्हणाले, स्व. गंगाधार मोरजे यांनी लोकसाहित्य विपुल संशोधन केले. त्यांनी निर्मिण केलेल्या वाटेवर अजूनही संशोधक चालत आहेत. नगर शहर स्थापना दिनाची सुरूवात

**आष्टी तालुक्यातील डॉ. रमेश खिळदकर, प्रा. राजाराम सोनटक्के, प्रा.गोपीनाथ बोडखे, पत्रकार जावेद पठाण ठरले पुरस्काराचे मानकरी**

स्व. गंगाधर मोरजे यांनी केली. यावेळी पुरस्कारार्थी अहमदनगर महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुधाकर शेलार, प्रा. डॉ. गोपीनाथ बोडखे, हभप मारोती चोंडीकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी प्रा. मच्छिंद्र मांलुजकर, प्रा. येळवंडे, प्रा. प्रकाश सूर्यवंशी, हमाल पंचायतीचे कार्ले, अविनाश कदम, डॉ. निर्मला पालेकर-ऐतलवाड, कल्याणी बरसमवाड आदींसह साहित्यप्रेमी उपस्थित होते. प्रास्ताविक पद्मगंगा फाउंडेशनचे अध्यक्ष माजी प्राचार्य धोंडीराम वाडकर यांनी केले. तर, सूत्रसंचालन प्रा. विठ्ठल बरसमाड यांनी तर, डॉ. ज्ञानेश ऐतवाल यांनी आभार मानले.

# महाराष्ट्र हिंदी प्रचार सभेच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** 10 जुलै 2022 रोजी, महाराष्ट्र हिंदी प्रचार सभा, औरंगाबादच्या स्थायी समितीची बैठक हिंदी भवन, शहागंज, औरंगाबाद येथे झाली. 10 जुलै 2022 रोजी झालेल्या स्थायी समिती व कार्यकारिणीच्या बैठकीत सन 2022-23 या वर्षासाठी खालीलप्रमाणे सर्वानुमते पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

पदाधिकाऱ्यांमध्ये डॉ. संध्या मोहिते यांची महाराष्ट्र हिंदी प्रचार सभेच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. डॉ. शेख मजीद, डॉ. नारायण वाकळे, सौ. वीणा चव्हाण, सौ. सुनीता शिंदे, डॉ. अलका गडकरी, श्रीमती नागज्योती पडगलवार, डॉ. मोरा लोअर, डॉ. दीपा कुचेकर, डॉ. चंद्रदेव कवडे, प्रा. सुरेश पुरी, पंतप्रधान हिंदी प्रचार सभा हैदराबाद. हिंदी प्रचार सभा हिंदी भाषेच्या उत्थान, संवर्धन आणि प्रचाराचे कार्य करत आहे. या सभेत आदरणीय चंद्रदेव कवडे जी यांचे हिंदी भाषा आणि नवीन शैक्षणिक धोरण या विषयावर महत्त्वपूर्ण व्याख्यान झाले. सुरेश पुरी पंतप्रधान हिंदी प्रचार सभा हैदराबाद, नारायण वाकळे, डॉ. संध्या मोहिते, राणेर, प्रकाश वाघमारे आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद





आज आषाढी एकादशीनिमित्त टाकळीभान येथील विठ्ठल दर्शनासाठी एस.एस.वाय श्रीरामपूर सेंटरने पदयात्रेचे आयोजन केले. यात साधकांनी सहभाग घेतला विठ्ठल दर्शन व पदयात्रेचा आनंद घेतला. टाकळी भान येथे अ‍ॅड. कापसे यांचे नातेवाईक थोरात व श्रीरामपूर येथे सतिष गवारे यांनी फराळाची व्यवस्था केली. सकाळी पाऊस असताना सुद्धा साधकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. चालता चालता निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याचा पदयात्रींनी आनंद घेतला. पुढील पदयात्रा देवगड येथे घेण्याचा निर्णय ठरला.



# रंगी रंगला पांडुरंग भक्तिमय सोहळा स्वरांच्या सरित चिंब भिजला

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** आषाढी एकादशीनिमित्त सादर झालेल्या भक्तिमय सोहळ्यात चिंब पाऊस असून देखील शेकडो भाविक भक्तांच्या उपस्थितीत सुश्राव्य असा भक्ती सोहळा सावित्री लॉन्स बीड बाय पास येथे सादर झाला. स्वर प्रथम प्रस्तुत रंगी रंगला पांडुरंग भक्ती सोहळ्यात चिंब पावसात देखील स्वरांनी भिजून रसिकांनी दाद दिली. या सोहळ्याचे हे चवथे वर्ष होते.

आमदार संदीपान भुमरे यांचा वाढदिवस विलासबापू भुमरे प्रतिष्ठान, शेखरभैय्या म्हस्के मित्रमंडळ यांनी आयोजन करून भक्तिरसात साजरा केला. विलासबापू भुमरे, वर्षाताई भुमरे यांच्यासह वारकऱ्यांनी दीप प्रज्वलन केले. सुहास महाजन यांच्या संकल्पनेतून साजरा झालेला हा सोहळा म्हणजे पांडुरंगमय करणारा झाला. प्रा.गजानन केचे यांच्या जय जय रामकृष्ण हरी या अभंगाने रसिकांना नामघोषात तल्लीन केले तर कु युगन्धरा केचे हिच्या सूर निरागस हो या गाण्याने मंत्रमुग्ध वातावरण झाले. प्रथमेश महाजन यांच्या निघालो घेऊन दत्ताची पालखी मध्ये रसिक, भाविक स्वार झाले तर कु नंदिनी महाजन हिच्या रखुमाई रखुमाई या गाण्याने विठ्ठला समवेत रखुमाईचाही गजर उपस्थित भाविकांनी केला.

तीन तास चाललेल्या भक्ती मौफल मध्ये शेकडो रसिक पांडुरंगमय झाले होते. या भक्तिरसात प्रसिद्ध संगीतकार, गायक श्री. व सौ. प्रीती अतुल दिवे, श्री. व सौ. श्रुती श्रीराज कुलकर्णी, श्री. व सौ. आरतीशामल महेश जोशी, श्री. व सौ. कल्याणी उमेश जोशी, प्राचार्या किरण रोडा यांच्यासह परिसरातील शेकडो नागरिक उपस्थित होते. शहरामधून देखील रसिकांची उपस्थिती होती हे विशेष. कार्यक्रमाचे सूत्रबद्ध निवेदन सुहास महाजन व मधुबाला कदम यांनी केले. स्वरप्रथम च्या वतीने शाल, श्रीफळ, श्री विठ्ठल रुखमाई प्रतिमा व मोरपीस अतिथी व कलावंत वादक यांना सप्रेम भेट देण्यात आली. साथ संगत तबला - संजय म्हस्के, संतोष केचे, सिंथेसायजर अरविंदकुमार, ऑक्टोपॅड आनंद आर्यन, बासरी निरंजन भालेराव यांनी साथ संगत केली.

# सोशल मीडियावर आक्षेपार्ह फोटो प्रसारित करु नका : सपोनि देवीदास वाघमोडे

## फर्दापूर येथे परिसरात सण, उत्सवात सलोखा कायम ठेवा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर पोलीस स्टेशन वतीने सोशल मिडीया वरील आक्षेपार्ह फोटो, स्टेटस व्हिडीओ क्लीप, प्रसारीत न करणेबाबत – सुचना करतांना सपोनि देवीदास वाघमोडे यांनी पालकांना बोलावून बैठक घेतली व पालकाना विनंती आहे की तुमच्या मुलावर लक्ष ठेवावे जेणेकरुन सोशल मिडीयावर कोणतीही अनावश्यक आक्षेपार्ह पोस्ट टाकु नये किंवा भाष्य करु नये जर कोणी इसमाने किंवा त्यांच्या पाल्याने अशा प्रकारच्या आक्षेपार्ह कमेन्ट्स टाकल्यास त्यावर गुन्हा नोदविला जाईल यांची नोंद घ्यावी, पोलीस स्टेशन फर्दापूरतर्फे सावळदबारा तसेच ग्रामीण भागातील सर्व व्हॉटसअ‍ॅप ग्रुप अ‍ॅडमीन यांना कलम 149 सीआरपीसी प्रमाणे नोटीस व इतर सोशल मिडीया वरील आक्षेपार्ह फोटो, स्टेटस व्हिडीओ क्लीप, प्रसारीत न करणेबाबत केल्या. सपोनि देवीदास वाघमोडे



यांनी जाहीर सुचना फर्दापूरात तसेच ग्रामीण भागातील सर्व व्हॉटसअ‍ॅप अडमीन तसेच फेसबुक इन्स्टाग्राम, टेलीग्रॉम मॅसेजींग अ‍ॅप्लीकेशन माध्यमाद्रवारे आक्षेपार्ह फोटो मॅसेज व्हीडीओ क्लीप प्रसारीत केल्या जात आहे.

सावळदबारा परीसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहुन शांतता काय टिकुन राहावी याकरीता कोणकोणत्या व्यक्तीला समाविष्ठ करुन शकता याबाबत सर्व अधिकार आपणास असुन सदर व्हॉटसअ‍ॅप ग्रुपमध्ये कोणते मॅसेज, फोटो व्हिडीओ क्लीप येतात किंवा पाठविल्या जातात. याबाबत आपणास पुर्ण कल्पना असते. तसेच आपण स्वतः इत्यादी तत्सम मॅसेजींग अप्लीकेशन माध्यमे वापरत आहात. त्यामुळे आपले ग्रुपमधुन कोणीही



आक्षेपार्ह धार्मिक स्थळ फोटो त्यावर झेंडे विटबंनासारखे किंवा यापुर्वी घडलेल्या घटना पुन्हा प्रकाशीत करणे व त्या आजच घडले आहे, असे भासविणे धर्माविषयी अपप्रचार, शाब्दीक व लिखानातुन अपप्रचार करणे किंवा समाजावर अन्याय करत आहे, असे भासविणे तसेच जातीय तेढ निर्माण करणे अफवा पसरविणे असे कृत्य इत्यादी तत्सम मॅसेजिंग अ‍ॅप्लीकेशन माध्यमाद्रवारे प्रसारीत करु नये तसेच आपले अकाउन्टवर आक्षेपार्ह फोटो व्हिडीओ क्लीप कोणी पाठविली तर आपण ती पुढे फॉरवर्ड करुन नये जागेवरच ब्लॉक करावे तसेच ज्यांनी ही आक्षेपार्ह फोटो व्हिडीओ क्लीप स्टेटस पाठवीले आहे त्याचे नाव मो.नंबर फर्दापूर पोलीस ठाण्यात कळवावे. व्हॉटसअ‍ॅप ग्रुप अ‍ॅडमीन यांनी आपल्या ग्रुपमधील सर्व सदस्यांना सुचना देणे बंधनकारक आहे.

तसेच सर्व पालकाना विनंती आहे की त्यांनी त्यांचे मुलावर लक्ष ठेवावे जेणेकरुन सोशल मिडीयावर कोणतीही अनावश्यक आक्षेपार्ह पोस्ट टाकु नये किंवा भाष्य करु नये जर कोण्ही इसमाने किंवा त्यांच्या पाल्याने अशा प्रकारच्या आक्षेपार्ह कमेन्ट्स टाकल्यास त्यावर गुन्हा नोदविला जाईल यांची नोंद घ्यावी. मॅसेज, फोटो, स्टेटस, व्हिडीओ क्लीप फॉरवर्ड केल्याचे कृतीमुळे काही अनुचित प्रकार घडुन शहरामध्ये तसेच ग्रामीण भागात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्मान झाल्यास ग्रुप अ‍ॅडमीन यांचेविरुध्द प्रचलित अधिनियम प्रचलित सर्व कायदे नियम परीपत्रे यानुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल तसेच सदरची नोटीस ही आपले विरुध्द न्यायालयामध्ये पुरावा म्हणुन सादर करण्यात येईल, यांची नोंद घ्यायची आहे. न घेतल्यास गुरुप अँडमिनवर कलम 149 सीआरपीसी प्रमाणे नोटीस काढण्यास येऊन गुन्हा दाखल करण्यात येईल असे आवाहन फर्दापूरचे पोलीस सहायक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी केले आहे.



# श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीनची शाळाबाह्य विद्यार्थी शोधमोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकीन :** पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथे जे विद्यार्थी काही कारणांमुळे शाळेत येत नाही. शाळेपासून दूर आहेत, अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शोध मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेची सुरूवात जनजागृती दिंडीचे आयोजन करून झाली. यानिमित्त आयोजित दिंडीला शालेय समितीचे अध्यक्ष नंदकुमार वैद्य, मुख्याध्यापक मनोहर चित्तोडकर, उपमुख्याध्यापक राजेंद्र कोठावदे, ज्ञानेश्वर चाटुपळे, विलास सोनजे, मंगला गायधने, मनिषा सोनवणे, किशोर नांवकर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अमृता काळे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी "करता पुस्तकांशी मैत्री,मिळते ज्ञानाची खात्री", "वाचनाची प्रेरणा, प्रगतीची धारणा", "पुस्तक माझा मित्र, बदलतो जीवनाचे चित्र", "पाहून पुस्तक, व्हावे नतमस्तक", "गैरहजेरीचा रोग टाळू, शिक्षणाचा वेग वाढू" यासारख्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. ही दिंडी यशस्वी करण्यासाठी अनिल साबळे, लक्ष्मीकांत जोशी, मंगेश डोलारे, जगन्नाथ राऊत, हेमंत जोशी, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.




# ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेत रियान तडवी चोपडा तालुक्यातून प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फरदापुर येथील रहिवाशी असलेले शिक्षक, सादिक तडवी यांचा मुलगा, चोपडा येथील पंकज विद्यालयाचा विद्यार्थी तसेच चोपडा तालुक्यातील श्रीमती. अ.खा.पाटील माध्यमिक विद्यालय मंगरूळ येथील शिक्षक सादिक तडवी यांचा मुलगा रियान तडवी याला ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश मिळाले असून त्याच्या या



यशामध्ये शारदा जुनिअर क्लासचे शिक्षक अभिषेक शुक्ल सर तसेच विद्यालयातील शिक्षक व पालक या सर्वांनी परिश्रम घेतले असून त्याच्या या यशाबद्दल रिहानचे, पालक यांचे सर्वत्र अभिनंदन व परिसरात कौतुक होत आहे.

# अवघा रंग एक झाला रंगी रंगला श्रीरंग

## आषाढी एकादशी निमित्ताने शिऊर येथे भाविकांची मांदियाळी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापुर :** वारकरी सांप्रदायात महत्वाच्या असणाऱ्या आषाढी एकादशी निमित्ताने संताची भूमी असलेले शिऊरगाव विठ्ठलमय झाले. शिऊर गावासह पंचक्रोशीतील भाविकांनी दर्शनासाठी मंदिरात गर्दी केली होती. श्री संत शंकरस्वामी महाराज यांनी स्थापित केलेल्या शिऊर येथील श्री विठ्ठल रुख्मिणीमंदिर व श्री संत शंकरस्वामी महाराज समाधी मंदिर येथे संस्थानचे अध्यक्ष एकनाथराव जाधव, शिऊर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील, सरपंच राजश्री जाधव, शिवाजी जाधव यांच्या हस्ते ग्रामस्थांच्या उपस्थितीत सामुदायिक महापूजा संपन्न झाली.

शिऊर गावातील संत बहिणाबाई, संत शिवाई, संत तुकाराम महाराज मंदिरासह विविध मंदिरात दर्शनासाठी दिवसभर भाविकांची रीघ लागली होती. महापूजेवेळी माजी सरपंच, संस्थानचे सचिव बबनराव जाधव, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष भास्कर जाधव, पंकज देशमुख, शिरीष चव्हाण, सुनील देशमुख, मंगेश जाधव, अनिल चव्हाण, वाल्मिक सोनवणे, रवींद्र देशमुख, दिलीप नाजीरे, पवन पाठक, दीपक गाजरे, स्वामी वंशज बंडोपंत लाखे, प्रकाश लाखे, रमेश लाखे आदी उपस्थित होते.

पांडुरंगाला साकडे यंदा राज्यात पाऊसपाणी चांगलं होऊ दे. राज्यातला बळीराजा सुखी होऊ दे. त्याच्या शेतशिवारात, घरात धनधान्याची, दुधदुभत्याची समृद्धी येऊ दे. बा पांडुरंगा, सर्वांना निरोगी, सुखी, समाधानी, आनंदी ठेव" असे साकडे संस्थान अध्यक्ष एकनाथराव जाधव यांनी पांडुरंगाला घातले.

कोरोनाच्या प्रादुर्भावानंतर सर्व निर्बंध हटवले गेल्याने संतभूमी शिऊर येथील सर्वच मंदिरात प्रथमच मोठी गर्दी झाली होती, रविवार आठवडी बाजार असल्याने पूर्ण गावात गर्दी दिसून आली, मंदिरात भाविकांनी शिस्तीत दर्शन घेतले दरम्यान शिऊर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला.



### समाधी मंदिरात आकर्षक सजावट, रांगोळीनेही वेधले लक्ष

आषाढी एकादशीचे औचित्य साधत श्री संत शंकरस्वामी महाराज, संत नारायणस्वामी महाराज यांच्या समाधीवर फुलांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती, समाधीवरील फुलांच्या सजावटीने व सायली लाखे तसेच घोडके दांपत्यानी रेखाटलेल्या रांगोळीने सर्वाचेच लक्ष वेधले.

आषाढी एकादशी निमित्ताने पांडुरंग-रुख्मिनी यांच्या मूर्तीसाठी डॉ. अशोकराव लाखे यांच्या वतीने विशेष पोशाख आणण्यात आला, रुख्मिनी मातेला साज शृंगार, भरजरी दागिने तर विठ्ठलाच्या मूर्तीला मोठा फेटा बांधण्यात आला, या मूर्तींना विशेष पोशाख परिधान करण्यासाठी तब्बल दीड तास लागल्याचे स्वामींचे वंशज बंडोपंत महाराज लाखेस्वामी यांनी सांगितले. श्री संत शंकरस्वामी महाराज संस्थान फडाचा २७७ वा अखंड हरिनाम सप्ताह या वर्षी श्री क्षेत्र शिऊर येथे दिनांक २ ते ९ ऑगस्ट दरम्यान व्यापक प्रमाणात होणार आहे, या सप्ताहाचे ध्वजपुजन देखील मोठ्या उत्साहात पार पडले.

### चित्रकलेने पांडुरंगाची आराधना

शिऊर येथील शिक्षक प्रवीण गवळी यांनी आपल्या चित्रकलेने पांडुरंगाचे चित्र रेखाटले, तसेच वारकरी दिंडीचे हुबेहूब चित्र रेखाटल्याने त्यांच्या कलेचे सोशलमीडियावर दिवसभर कौतुक सुरू होते.

संतभुमी असलेल्या शिऊर गावाला विशेष महत्व आहे, आषाढी एकादशीचे औचित्य साधत अनेक दिंड्या हरिनामाचा जयघोष करत शिऊर येथे दाखल झाल्या होत्या. शिऊर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील हे महापूजेसाठी सपत्नीक उपस्थित होते, त्यांच्या हस्ते दोन्हीही मंदिरात महापूजा झाली संस्थानच्या वतीने अध्यक्ष एकनाथराव जाधव यांच्या हस्ते सपोनि पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

# पंचक्रोशीतील नागरिकांसाठी भव्य महाआरोग्य शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**सावळदबारा :** सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील परिसरात केसुला प्रतिष्ठाण नांदा तांडा व सावळदबारा ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत भव्य महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या 13/7/2022 बुधवार रोजी गुरुपौर्णिमेचे औचीत्य साधुन सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

### या शिबीराचा लाभ घ्यावा : प्रदीप चव्हाण



गरीब जनतेची रुग्णालयात होणारी पैशांची लुटमार याला आळा घालण्यासाठी व गरजू रुग्णांना या उपक्रमांचा फायदा व्हावा यासाठी केसुला प्रतिष्ठानचे संस्थापक प्रदीप चव्हाण व मो.तालिब मो.छब्बीर (सामाजिक कार्यकर्ते) यांनी जळगाव येथील गोदावरी फाउंडेशन च्या अध्यक्षांची भेट घेऊन आमच्या सावळदबारा सर्कलमध्ये महाआरोग्य शिबीर आयोजित करण्यात यावू अशी विनंती केली असता गोदावरी फाउंडेशनच्या अध्यक्षांनी परवानगी दिली तरी पंचक्रोशीतील जनतेनी येणाऱ्या 13/7/22 बुधवार रोजी गुरुपौर्णिमेच्या दिवशी आरोग्य शिबीराचा लाभ मोफत स्वरूपात घ्यावा. यामध्ये 2D इको, E.C.G., कारडिओग्राफी, मधुमेह, रक्तदाब, मुतखडा, नेत्र तपासणी, हृदय विकार तपासणी इ. केली जाणार आहे. तरी पंचक्रोशीतील तमाम जनतेनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रदीप चव्हाण भाजपा युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष व मो.तालिब मो.छब्बीर सामाजिक कार्यकर्ते यांनी केले आहे.

# महाराष्ट्राच्या ५ महिला बॉक्सिंग खेळाडूंचा अंतिम फेरीत प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** ५ जुलै ते १२ जुलै २०२२ दरम्यान बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्यावतीने तामिळनाडू (चेन्नई) येथे सुरू असलेल्या महिला व पुरूष युवा गटाच्या राष्ट्रीय बॉक्सिंग अजिंक्यपद चॅम्पियनशिपमध्ये महाराष्ट्राच्या महिला बॉक्सिंग खेळाडूंनी अप्रतिम खेळ ५ महिला खेळाडूंनी अंतिम फेरीत प्रवेश केला.

दिनांक १० जुलै रोजी झालेल्या उपांत्य फेरीत आप-आपल्या वजन गटात अतिशय सुंदर प्रदर्शन करत महाराष्ट्राच्या बॉक्सिंग खेळाडूंनी वर्चस्व राखले. त्यात ५२ किलो वजनी गटात देविका घोरपडे, ५७ किलो वजनी गटात आर्या बारटक्के, ७५ किलो वजनी गटात शर्वरी कल्याणकर, ८० किलो वजनी गटात मुजावर नस्विरा, ८० किलो वरील वजनी गटात कांचन सुरांसे यांनी विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. शर्वरी, कांचन यांनी पहिल्याच राऊंड मध्ये विजय मिळवला तर देविका, नस्विरा यांनी दुसऱ्या राऊंडमध्ये आपल्या प्रतिस्पर्धी खेळाडूला नमविले. याचबरोबर आर्या बारटक्के हिने सुंदर खेळ केला.

या सर्व खेळाडूंना महाराष्ट्र महिला बॉक्सिंग संघाचे मुख्य प्रशिक्षक धनंजय बनसोडे, वर्षा त्रिपाठी, व्यवस्थापक नेहा म्हात्रे यांचे अमूल्य असे मार्गदर्शन लाभले. याबद्दल महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष रणजित सावरकर, महासचिव डॉ. राकेश तिवारी व संघटनेचे सर्व पदाधिकारी यांनी अभिनंदन करत उद्या होणाऱ्या अंतिम फेरीसाठी शुभेच्छा दिल्या.



# गंगापूर शहरात विठ्ठल रूख्मिनी मंदिरात प्रसाद वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** शहरात आषाढी एकादशी निमित्ताने शहरातील श्री विठ्ठल रूख्मिनी मंदिरामधे शिव शंभू योध्दा ग्रुपच्या माध्यमातून राजगीरा लाडु प्रसाद वाटप करण्यात आला.

प्रत्येक वर्षी आषाढी निमित्ताने या उपक्रमाचे आयोजन हा ग्रुप करत असतो. दोन वर्ष कोरोनामुळे खंडीत झालेला हा उपक्रम पुन्हा एकदा ग्रुपच्या वतीने सुरु करण्यात आला असून यावेळी ग्रुप चे सदस्य शुभम कुलकर्णी, तुशांत पठाडे, पुष्कर मालपाणी, धनराज काकडे, अनिल नरोडे, अमोल साळुंके, उमेश चव्हाण, अर्जुन कराळे, आकाश मोरे, कृष्णा सुवर्णकार, गणेश उदावंत, योगेश कुरकुटे, मनोज पुंडेकर हे सर्व उपस्थित होते.



# लासूर स्टेशनला नगीना मस्जिद परिसरात पेव्हर ब्लॉक सुशोभीकरण कामाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन आ. प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायत सदस्य नारायण वाकळे यांच्यातर्फे बकरी ईदचे औचित्य साधत सक्खीर भाई मोहल्यातील नागिना मस्जिद परिसरातील सहान जागेमध्ये पेव्हर ब्लॉक बसवण्याचे उद्घाटन करून प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली.

यावेळी नगिणा मस्जिदचे मौलाना मोबिन पटेल, भाजपयुमोचे जिल्हापाद्यक्ष अमोल पाटील जाधव, रजाक पठाण, संजय पांडव, बाजार समिती संचालक सुरेश जाधव, माजी उपसरपंच जनसेवक गणेश व्यवहारे, ग्रामपंचायत सदस्य अशोक सौदागर, कल्याण पाटील पवार व मौलाना आझाद फ्रेंड सर्कलचे पदाधिकारी व नागरिक यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# राजा माने यांना सुधारककार आगरकर राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

## कराडच्या इंद्रधनु विचारमंच फाउंडेशनचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सुधारककार गोपाळ गणेश आगरकर यांच्या १६६ व्या जयंती निमित्त कराड येथील इंद्रधनु विचारमंच फाउंडेशनच्यावतीने या वर्षीपासून प्रथमच विविध माध्यम प्रकारातील योगदानाबद्दल राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार दिले जात आहेत. ज्येष्ठ संपादक राजा माने यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. सुधारककारांच्या टेंभू,ता. कराड, जि.सातारा या जन्मगावी गुरुवार दि. १४ जुलै रोजी सकाळी १० वाजता पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. या सोहळ्यात महाराष्ट्रातील ६ पत्रकारांना पुरस्कार सन्मानित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे, जिल्हाधिकारी शेखर सिंह, सातारा जिल्हा पोलीस प्रमुख अजयकुमार बंन्सल, सातारा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष हरिष पाटणे उपस्थित राहणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान टेंभू गावचे लोकनियुक्त सरपंच युवराज भोईटे भूषविणार आहेत. यावेळी कराडचे प्रांताधिकारी उत्तम दिघे, कराड उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.रणजीत पाटील, तहसिलदार विजय पवार, उद्योजक रामकृष्ण वेताळ, पत्रकार संघाचे सातारा शहर अध्यक्ष विनोद कुलकर्णी आदी मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत.

सन २०२२ चा गोपाळ गणेश आगरकर सुधारक पुरस्कार सोलापूर येथील ज्येष्ठ संपादक राजा माने, सातारा येथील दैनिक ग्रामोध्दारचे संपादक बापूसाहेब जाधव, दैनिक सकाळ पुणे उपसंपादक आशिष तागडे, सिंधुदुर्ग लाईव्हचे कार्यकारी संपादक अर्जुन धस्के, झी २४ तास चॅनलचे सातारा जिल्हा प्रतिनिधी तुषार तपासे, दैनिक पुढारी कोल्हापूरच्या स्नेहा मांगुरकर यांना प्रदान



करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील विचारवंत, समाजसुधारक, पत्रकार व शिक्षणतज्ज्ञ गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म कराड तालुक्यातील टेंभू येथे १४ जुलै १८५६ साली अत्यंत सामान्य कुटुंबात झाला. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात सामाजिक जागृतीत आगरकरांचे योगदान मोलाचे आहे. त्यांनी समाज प्रबोधन करण्यासाठी सुधारक, केसरी व मराठा या वृत्तपत्रांचा आधार घेतला. सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता आणि विज्ञान-निष्ठा ही त्यांची जीवनमूल्ये होती. मुलींनासुद्धा शिक्षण मिळायला पाहिजे असा लेख त्यांनी सुधारक या वृत्तपत्रात लिहिला.

बुद्धिप्रामाण्य वादाचे पुरस्कार करून महाराष्ट्रामध्ये समाज सुधारणा घडून आणणे या उद्देशाने समाजसुधारणा करणाऱ्या समाजसुधारकांमध्ये गोपाळ गणेश आगरकर यांचा समावेश होतो. महाराष्ट्रातील समाज सुधारकांच्या मांदियाळीतील क्रांतीकारी समाजसुधारक म्हणून आगरकर हे महत्त्वपूर्ण ठरतात. सुधारककार गोपाळ गणेश आगरकर यांची कर्मभूमी असलेल्या टेंभू येथील पत्रकारांच्या पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन इंद्रधनु विचारमंच फाउंडेशनचे विश्वस्त विकास भोसले, नितीन ढापरे, संदीप चेणगे, प्रमोद तोडकर, अशोक मोहने, माणिक डोंगरे यांनी केले आहे.



# एनएलयू नागपूरला जगातील श्रेष्ठ विधी विद्यापीठ बनवावे

## केंद्रीय रस्ते वाहतूक महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** नागपूरमधील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ-एनएलयूने स्वतःच्या जबाबदारीवर तसेच शासनाच्या मदतीने विद्यापीठाचे विस्तारीकरण करून एनएलयू नागपूरला जगातील श्रेष्ठ विधी विद्यापीठ बनवावे, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केले. ते नागपूरच्या वर्धा रोडवरील वारंगा कॅम्पस येथील एनएलयूच्या वसतीगृह व अम्नेटी बिल्डींगचे उद्‌घाटन कार्यक्रमा प्रसंगी बोलत होते. या वसतीगृहाचे उद्‌घाटन विद्यापीठाचे कुलपती आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती भूषण गवई यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पी. नरसिम्हा, विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. विजेंदर कुमार प्रामुख्याने उपस्थित होते.

नागपूर खऱ्या अर्थाने शैक्षणिक हब बनत असून येथील एम्स, सिम्बॉयसिस विघापीठ, भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्था तसेच अभियांत्रिकी संस्था यामध्ये आता राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या रूपाने भर पडली आहे. मिहानमध्ये नामांकित माहिती-तंत्-रज्ञानाच्या कंपन्या आल्या असून गेल्या दोन वर्षात 56 हजार लोकांना येथे रोजगार मिळाला आहे. नागपुरवरून खापरीपा-सून बुटीबोरीपर्यंत येणारा उड्डाणपूल हा डबल डेकर होणार असून हा रस्ता सुद्धा सहापदरी होणार आहे. वारंगा येथे विधी विद्यापीठाकडे जाणाऱ्या मार्गावर एक स्पेशल जंक्शन तयार करण्यात येणार आहे.

# आंतरराज्यीय टोळीला फिल्मीस्टाईल अटक : नंबरप्लेट बदलून करायचे प्रवास

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** फिरण्यासाठी महागडी कार, त्यातून शहरातील सीसीटीव्हीचा अभ्यास, पोलिसांना लोकेशन कळू नये म्हणून टोळीतील सदस्यांसोबत संपर्कासाठी वॉकीटॉकी, कुलूप तोडण्यासाठी स्वतः तयार केलेली उपकरणे अशा हायटेक पद्धतीने घरफोडी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा गुन्हे शाखेने फिल्मीस्टाईलने मुसक्या आवळल्या आहेत. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थानात कारनामे करणाऱ्या या आंतरराज्यीय टोळीकडून कारसह १० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या टोळीने २१ घरफोड्या केल्याची कबुली दिली आहे. अनुप श्रीगुनारायण सिंग (३६, भोपाळ, मध्यप्रदेश), अभिषेक राजू सिंग (२९, भोपाळ, म.प्र.), विविध राज्यांत हायटेक घरफोड्या करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीच्या गुन्हे शाखे मुसक्या आवळल्या. उपायुक्त चिन्मय पंडीत यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई केली. अमित ओमप्रकाश सिंग (३४, भोपाळ, म.प्र.) व इम्रान अल्वी ऊर्फ इसाक अल्वी (३४, हापोड, उत्तरप्रदेश) ही आरोपींची नावे आहेत. या टोळीने २६ जून रोजी नागपुरात चार - पाच ठिकाणी घरफोड्या केल्या. घरफोडी पथकाचे एपीआय मयूर चौरसिया हे आठवडाभर शहरातील अत्याधुनिक यंत्रांच्या आधारे घरफोडी या टोळीचा म्होरक्या अनुप सिंग आहे. सुमारे सात वर्षांपासून तो ही टोळी चालवत होता. त्याच्यावर अनेक राज्यांत गुन्हे दाखल आहेत. कारमधून तो आपल्या साथीदारांसह भोपाळहून निघायचा. त्याला ज्या शहरात चोरी करायची आहे. तेथील पॉश भागात तो दिवसभर फिरायचा आणि बंद घरे व बंगले शोधायचा. या टोळीकडे कुलूप



किंवा दरवाजा क्षणात तोडणारी स्वतः तयार केलेली अत्याधुनिक उपकरणे आहेत. अनुप सिंगने स्वतः लेथ मशीनच्या मदतीने ते तयार केले आहेत. एखादे असे घर लक्षात आले की टोळी तेथे काही वेळातच घरफोडी करून व रोख रक्कम, मौल्यवान वस्तू चोरून टोळी फरार व्हायची. एका शहरात ते चार ते पाच घरफोड्या करायचे.

टोळीचा म्होरक्या अनुप सिंग मध्यप्रदेशमध्ये दागिने विकायचा, गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र, मध्यप्रदेश या राज्यांत ही टोळी सक्रिय होती. सीसीटीव्हीचा अभ्यास करत होते. यातून आरोपी कारमध्ये बसून दुसऱ्या राज्यात जात असताना अनेक ठिकाणी नंबर प्लेट बदलल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी या टोळीच्या कारचा शोध सुरू केला. ही टोळी शनिवारी दुपारी काटोल नाक्यावरून जात असल्याची माहिती त्यांना मिळाली. पोलिसांनी सापळा रचून त्यांची गाडी थांबवली. पोलिसांच्या वाहनाला धडक देऊन आरोपींनी पळून जाण्याचा प्रयत्न केला; मात्र चारही बाजूंनी घेरल्याने त्यांना यश आले नाही.



# ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेच्या वतीने गीत-गझल कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेच्या साप्ताहिक कार्यक्रमात गुरुवार ७ जुलै २०२२ रोजी प्रसिद्ध गझल गायक राज वैराळ यांचा गीत-गझल कार्यक्रम संम्पन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भरत कुलकर्णी होते. श्रीकांत पत्की यांनी सूत्र संचलन केले. विभा श्रीवास्तव, प्रेमचंद तुल्ले, प्रफुल्ल पांडे, सुर्यकांत कुलकर्णी, श्रीराम जोशी व संस्थेचे सभासद मोठ्या संखेने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात "ऐसी लागी लगन मीरा होगई मगन" या भजनाने केली. त्यानंतर त्यांनी तुमको देखा तो ये खयाल, चुपके चुपके रात दिन, होठोसे छूलो तुम, होश वालोंको खबर क्या बेखुदी क्या चीज है, झुकी झुकी सी नजर, हम तेरे शहर मे आये है, तुम इतना जो मुस्कुरा रहेहो, चौदहवी का चांद हो, चांदी जैसा रंग है तेरा सोने जैसे बाल इत्यादी गझल सादर करून श्रोत्यांच्या टाळ्या मिळविल्या. संतोष लोमटे यांनी तबल्यावर, आनंद आर्यन यांनी गिटारवर साथ संगत केली तर अंकुश मस्के यांनी ध्वनीप्रक्षेपण केले. भरत कुलकर्णी यांनी अध्यक्षीय समारोप केला. श्रीकांत पत्की यांनी सुत्रसंचलन केले, विभा श्रीवास्तव यांनी आभार प्रदर्शन केले.





# नवोदय विद्यालयासाठी कल्याणी पल्हाळची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**माळीवाडा :** येथील जि.प. प्रा. शा. माळीवाडा, केंद्र दौलताबाद, ता. संभाजीनगर, जि. संभाजीनगर या शाळेतील विद्यार्थिनी कु.कल्याणी कृष्णा पल्हाळ हिची नवोदय विद्यालयासाठी निवड झाली आहे.

या शाळेतील ती दहा वर्षांतील पहिली विद्यार्थिनी आहे. कल्याणी अत्यंत साधारण कुटुंबातील आहे. परंतु ती अत्यंत मेहनती व हुशार आहे. या तिच्या यशात तिला शिकवणारे तिचे शिक्षिका सौ.आशाबाई पाटील व संभाजी पाटील हे दोघांच्या मार्गदर्शनाखाली तिने परीक्षेची तयारी केली होती. सतत शिक्षकांच्या पाठीशी असणारे मुख्याध्यापक गंगाधर अधाने या



यशाबद्दल ग्रा.शिक्षण समिती अध्यक्ष नंदकिशोर मुळे, सरपंच अनिता हेकडे, उपसरपंच कडूभाऊ किर्तीकर, माजी सरपंच जगन्नाथ भगत, माजी शिक्षण समिती अध्यक्ष बाळु हेकडे व जि.प.शाळेच्या सर्व शिक्षिका आदींनी अभिनंदन केले.